सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक


https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ९९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. ९ मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## सांबा सेक्टरमध्ये घुसखोरीचा प्रयत्न उधळला; बीएसएफच्या कारवाईत ७ दहशतवाद्यांचा खात्मा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९जम्मू**

जम्मूमधील सांबा सेक्टरमधून काल रात्री भारतात घुसखोरी करण्याचा प्रयत्न करणारे जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेचे सात दहशतवादी सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) कारवाईत ठार झाले आहेत. याबाबत बीएसएफने एका निवेदनाद्वारे माहिती दिली आहे. या कारवाईदरम्यान, बीएसएफने पाकिस्तानी रेंजर्सच्या सीमा चौकीचे मोठे नुकसान केले, जिथून या दहशतवाद्यांना घुसखोरी करता यावी यासाठी



जोरदार गोळीबार करण्यात येत होता.

जम्मू फ्रंटियर बीएसएफच्या सांबा सेक्टरमध्ये, ८ आणि ९ मे २०२५ च्या मध्यरात्री, दहशतवाद्यांच्या एका गटाने घुसखोरीचा प्रयत्न केला होता. या दहशतवाद्यांना घुसखोरी करता यावी यासाठी पाकिस्तानी रेंजर्सच्या चौकीतून गोळीबार करण्यात आला. परंतु बीएसएफच्या सतर्क जवानांनी घुसखोरीचा हा प्रयत्न निष्फळ ठरवत किमान ७ दहशतवाद्यांचा खात्मा केला आणि पाकिस्तानी रेंजर्स पोस्टचे मोठे नुकसान केले, असे बीएसएफच्या प्रवक्त्याने सांगितले.

तत्पूर्वी काल रात्री, पाकिस्तानने नियंत्रण रेषा आणि आंतरराष्ट्रीय सीमेवर विविध ठिकाणी ड्रोन हल्ले करण्याचे अयशस्वी प्रयत्न केले. या हल्ल्यांना उधमपूर, सांबा, जम्मू, अखनूर, नागरोटा आणि पठाणकोट भागात भारतीय लष्कराच्या हवाई संरक्षण यंत्रणेने सडेतोड उत्तर दिले. या कारवाईत एल-७० तोफा, झेयू-२३एमएम, शिल्का प्रणाली आणि इतर प्रगत काउंटर-यूएएस उपकरणांचा मोठ्या प्रमाणत वापर करण्यात आला. याबाबत एएनआय या वृत्तसंस्थेने सूत्रांच्या हवाल्याने वृत्त दिले आहे.पाकिस्तानी ड्रोन आणि क्षेपणास्त्र विमानांनी जम्मू काश्मीरपासून पंजाब, राजस्थान आणि गुजरातपर्यंतच्या शहरांमधील भारतीय लष्करी तळांना लक्ष्य करण्याचे धाडस केले परंतु त्यापैकी कोणत्याही ठिकाणी त्यांना यश मिळाले नाही. भारतीय हवाई संरक्षण यंत्रणेने त्या सर्वांना हाणून पाडले आहे. पाकिस्तानने संपूर्ण जम्मू-काश्मीरमध्ये नियंत्रण रेषेवर गोळीबार केला आहे, ज्याला भारतीय सैन्य योग्य उत्तर देत आहे.

## पाकिस्तानने आता पीडित असल्याचा कांगावा करु नये, दहशतवाद्यांनी, निकी हॅले यांची पोस्ट चर्चेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९वाशिंग्टन**

२२ एप्रिलला पाकिस्तानमधल्या दहशतवाद्यांनी भारतातल्या काश्मीरमधल्या पहलगाम या ठिकाणी आलेल्या २६ पर्यटकांची गोळ्या झाडून हत्या केली. या घटनेचा जगभरातून निषेध करण्यात आला. त्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानच्या भ्याड हल्ल्याला चोख प्रत्युत्तर दिलं. मात्र पाकिस्तानने त्यानंतरही आगळीक करणं सोडलेलं नाही. त्यामुळे पाकिस्तानला भारताने जशास तसं उत्तर दिलं आहे. दरम्यान अमेरिकेच्या नेत्या



निकी हॅले यांनी पाकिस्तानला खडे बोल सुनावले आहेत. पाकिस्तानने हल्ला पीडित असल्याचं कार्ड खेळू नये असं आता निकी हॅले यांनी म्हटलं आहे.


दहशतवाद्यांनी हल्ला करुन निष्पाप नागरिकांचा बळी घेतला. त्यानंतर प्रत्युत्तर देण्याचा भारताला पूर्ण अधिकार आहे. पाकिस्तानने आता हल्ला पीडित आहोत वगैरे कार्ड खेळू नये, उगाच कांगाव करु नये. दहशतवादी कारवायांना तुम्ही पाठिंबा दिला म्हणून तुम्हाला कुणी असंच माफ करणार नाही. भारताने जे केलं ते योग्यच आहे. असं म्हणत निकी हॅले यांनी पाकिस्तानला झापलं आहे.

## 'ऑपरेशन सिंदूर'नंतर आरएसएसची मोदी सरकारच्या पाठीवर कौतुकाची थाप, भारतीय सैन्याचे केले अभिनंदन

### ऑपरेशन सिंदूर भारत सरकारच्या नेतृत्वात सैन्य दलांनी उचलेलं महत्त्वाचं पाऊल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नागपूर**

पहलगामच्या दहशतवादी हल्ल्यात चार दहशतवाद्यांनी २६ पर्यटकांची हत्या केली. या हल्ल्याचा निषेध जगाने नोंदवला. त्यानंतर काही कालावधीतच या हल्ल्यामागे पाकिस्तान असल्याचं कळलं होतं. ज्यानंतर भारताने ६ आणि ७ मेच्या रात्री ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिलं. पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानमधले दहशतवादी अड्डे उद्धवस्त केले. यानंतर आता या कारवाईचं सरसंघचालक मोहन भागवत यांनी कौतुक केलं आहे.




ऑपरेशन सिंदूर भारत सरकारच्या नेतृत्वात आणि सैन्य दलांनी उचलेलं महत्त्वाचं पाऊल आहे. जे क्रूर हत्याकांड दहशतवाद्यांनी घडवून आणलं आणि भ्याड हल्ला केला तेव्हापासूनच देशवासियांच्या मनात पीडित कुटुंबांना, माता भगिनींना न्याय मिळावा ही देशभावना होती. ज्यानंतर ही कारवाई करण्यात आली. आम्ही सरकारचं आणि सैन्य दलांचं अभिनंदन करतो.

सरकारने आणि सैन्य दलांनी ऑपरेशन सिंदूर राबवल्याने संपूर्ण देशाची हिंमत वाढली आहे आणि त्यांची छाती अभिमानाने फुलली आहे. पाकिस्तानने जे केलं त्यानंतर भारतीय सैन्य दलांनी दिलेलं उत्तर ही महत्त्वाची आणि अपरिहार्य कारवाई होती. भारत आणि पाकिस्तान यांच्यात संघर्ष सुरु आहे. अशा संकट काळात आम्ही तन-मन-धनासह देशाच्या सरकारच्या आणि सैन्य दलांच्या पाठिशी आहोत. पाकिस्तानी सैन्याकडून सामान्य नागरिकांचा विचार न करता हल्ले केले जात आहेत. सीमा भाग आणि धार्मिक स्थळं यांना लक्ष्य केलं जातं आहे. या घटनांमध्ये ज्यांना प्राण गमावावा लागला त्यांच्या प्रति आमच्या सहवेदना आहेत. आम्ही त्या कुटुंबांच्या दुःखात सहभागी आहोत. असंही मोहन भागवत यांनी म्हटलं आहे.

## गस्त वाढवा, 'त्या' हँडल्सवर लक्ष ठेवा, वरिष्ठांच्या सुट्या रद्द; मुख्यमंत्री फडणवीसांकडून महत्त्वाचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९मुंबई**

भारत आणि पाकिस्तानातील तणावाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पोलिस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातील एकूणच सुरक्षा आणि सज्जतेचा आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते.

मॉकड्रिल, ब्लॅकआऊट इत्यादी सर्वच बाबतीत समग्र आढावा घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विविध दिशानिर्देश दिले. प्रभारी मुख्य सचिव राजेशकुमार, राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, नागरी सुरक्षाचे



अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रभातकुमार, गृहविभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक शिरीष जैन, मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी उपस्थित होते.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले निर्देश पुढीलप्रमाणे...**

प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रिल करा आणि जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापित करा.

ब्लॅकआऊट वेळी हॉस्पिटलसोबत समन्वय यंत्रणा उभी करा. टार्गेट होऊ नये म्हणून लाइट बंद केले जातात, त्यामुळे पर्यायी विद्युत व्यवस्थेद्वारे यंत्रणा सुरू ठेऊन, गडद रंगाचे पडदे अथवा गडद रंगाच्या काचा वापरून त्याचवेळी बाहेरून लाईट दिसणार नाही, अशी व्यवस्था करा.

ब्लॅकआऊट म्हणजे काय आणि अशावेळी काय करावे, यांचे व्हिडिओ विद्यार्थी, नागरिकांपर्यंत पोहोचवा. व्यापक जनजागरण करा.

केंद्र सरकारच्या 'युनियन वॉर बुक' चे सखोल अध्ययन करीत सर्वांना त्याची माहिती द्या.

प्रत्येक जिल्ह्यात पोलिसांच्या सायबर सेलने समाजमाध्यमांवर देखरेख ठेवत पाकिस्तानला मदत करणारे हॅण्डल ओळखून त्यावर कारवाई करा. शत्रूला मदत करणारी अथवा चुकीची माहिती कुणी प्रसारित करीत असेल तर त्यावर कारवाई करा.

प्रत्येक जिल्हाधिकारी यांना आपत्कालीन फंड आजच देणार, ज्यातून काही तातडीच्या साहित्याची खरेदी करायची असतील तर ती तत्काळ करता येईल. याव्यतिरिक्त कोणताही महत्वाचा प्रस्ताव यासंदर्भात आला तर तो १ तासात मंजूर करा.

पोलिस विभागाने नेहमीपेक्षा जास्त जागरूकता ठेवावी. देशद्रोही व्यक्तींच्या कारवाया वाढण्याची शक्यता पाहता अधिक कोंबिग ऑपरेशन करा आणि गस्त अधिक चोख करा.

एमएमआर क्षेत्रातील सर्व महापालिकांची बैठक घ्या, त्यांनाही 'ब्लॅकआऊट' बाबत जागरूकता निर्माण करण्यास सांगा. यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांना सहभागी करून घ्या.

## नागपूरचे 'नागास्त्र' बनले भारतीय सेनेचे महत्त्वाचे शस्त्र

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९ नागपूर**

'ऑपरेशन सिंदूर 'दरम्यान पाकिस्तानवर ड्रोन हल्ल्यात भारतीय सशस्त्र दलांनी नागपूरस्थित सोलर इंडस्ट्रीजच्या 'नागास्त्र'चा वापर केला. या युद्धात, नागपुरात बनवलेले 'नागास्त्र' हे भारतीय सैन्याचे एक शक्तिशाली शस्त्र बनले आहे. हे कळताच, लोकमतच्या एडिटोरियल बोर्डचे चेअरमन आणि माजी खासदार डॉ. विजय दर्डा यांनी सोलर इंडस्ट्रीज इंडियाचे चेअरमन सत्यनारायण नुवाल यांच्याशी संवाद साधला आणि या कामगिरीबद्दल आणि देशाच्या सुरक्षेतील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांचे अभिनंदन केले.



यावेळी सत्यनारायण नुवाल यांनी डॉ. दर्डा यांना सांगितले की, त्यांच्या कंपनीने विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा वापर भारतीय सैन्य देशाच्या सुरक्षेसाठी करत आहे, याचा त्यांना अभिमान आहे. डिसेंबर २०२४ मध्येच भारतीय सेनेला अधिकृतपणे 'नागास्त्र-१' ड्रोन मिळाले, हे विशेष.

गेल्या ३० मार्च रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागपूरच्या सोलार प्लांटमध्ये विविध श्रेणीतील ड्रोनसाठी धावपट्टी सुविधेचे उद्घाटन करून सोलार इंडस्ट्रीजची पाहणी केली होती. त्यावेळी सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस लिमिटेड येथे यूएव्हीसाठी लोइटरिंग म्युनिशन टेस्टिंग रेंज आणि रनवे सुविधेचे उद्घाटन केले. युनिट सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस लिमिटेडने विकसित केलेल्या 'नागास्त्र-३' कामिकेज ड्रोन सिस्टीमची पाहणी केली होती. त्यावेळी हे ड्रोन प्रोटोटाइप टप्प्यात होते.

## ऑपरेशन 'सिंदूर' नंतर पाकिस्तान घाबरला, पीएसएलचे सर्व सामने रद्द होणार

### रावळपिंडी स्टेडियम जवळ ड्रोनने हल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९लाहोर**

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानमधील ९ दहशतवादी ठिकाणांवर हवाई हल्ला करत बदला घेतला आहे. या कारवाईनंतर पाकिस्तानने भारतातील तब्बल १५ ठिकाणी हल्ला करण्याचे प्रयत्न केला होता मात्र भारतीय लष्कराने इंटिग्रेटेड काउंटर यूएएस ग्रिड आणि एअर डिफेन्स सिस्टमने पाकिस्तानचा हा प्रयत्न हाणून पाडला.

तर दुसरीकडे पाकिस्तान आणि भारतात वाढत असणाऱ्या तणावामुळे पाकिस्तान सुपर लीग अडचणीत आली आहे. सध्या समोर आलेल्या माहितीनुसार पीएसएलचे उर्वरित सर्व सामने रद्द होऊ शकतात किंवा दुसऱ्या देशात शिफ्ट होण्याची शक्यता आहे. काही वेळापूर्वी रावळपिंडी स्टेडियम जवळ ड्रोनने हल्ला करण्यात आला आहे. यामुळे आज रात्री या स्टेडियममध्ये होणारा पीएसएल सामना रद्द करण्यात आला आहे. तर पीसीबीने पीएसएलचे उर्वरित सामने दुसऱ्या देशात करण्याबाबत विचार करायला सुरुवात केली आहे.

पाकिस्तानी वृत्तवाहिनी जिओ न्यूजच्या वृत्तानुसार, पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अधिकारी यासंदर्भात गृहमंत्रालयाला भेटणार आहेत. बैठकीत ते परिस्थितीचा आढावा घेतील आणि पीएसएलवर त्याचा संभाव्य परिणाम काय होईल यावर चर्चा करतील. समोर आलेल्या




माहितीनुसार, या बैठकीत पीएसएल सामने पूर्वीसारखेच सुरू राहतील की स्थगित केले जातील याचा निर्णय घेतला जाणार आहे. तसेच पीसीबी सध्या पीएसएलचे उर्वरित सामने दुबई किंवा दोहामध्ये आयोजित करण्याचा विचार करत आहे. सध्या या स्पर्धेचे सर्व उर्वरित सामने कराचीमध्येच आयोजित करण्याचा निर्णय पीसीबीने घेतला आहे.तर दुसरीकडे पाकिस्तान आणि भारतात वाढत असणाऱ्या तणावामुळे पाकिस्तान सुपर लीग अडचणीत आली आहे. सध्या समोर आलेल्या माहितीनुसार पीएसएलचे उर्वरित सर्व सामने रद्द होऊ शकतात किंवा दुसऱ्या देशात शिफ्ट होण्याची शक्यता आहे. काही वेळापूर्वी रावळपिंडी स्टेडियम जवळ ड्रोनने हल्ला करण्यात आला आहे. यामुळे आज रात्री या स्टेडियममध्ये होणारा पीएसएल सामना रद्द करण्यात आला आहे. तर पीसीबीने पीएसएलचे उर्वरित सामने दुसऱ्या देशात करण्याबाबत विचार करायला सुरुवात केली आहे.

पाकिस्तानी वृत्तवाहिनी जिओ न्यूजच्या वृत्तानुसार, पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अधिकारी यासंदर्भात गृहमंत्रालयाला भेटणार आहेत. बैठकीत ते परिस्थितीचा आढावा घेतील आणि पीएसएलवर त्याचा संभाव्य परिणाम काय होईल यावर चर्चा करतील. समोर आलेल्या माहितीनुसार, या बैठकीत पीएसएल सामने पूर्वीसारखेच सुरू राहतील की स्थगित केले जातील याचा निर्णय घेतला जाणार आहे. तसेच पीसीबी सध्या पीएसएलचे उर्वरित सामने दुबई किंवा दोहामध्ये आयोजित करण्याचा विचार करत आहे. सध्या या स्पर्धेचे सर्व उर्वरित सामने कराचीमध्येच आयोजित करण्याचा निर्णय पीसीबीने घेतला आहे.

## संपादकीय ......

# संघर्ष निर्णायक टप्प्यावर!

भारताच्या एअरस्ट्राईकनंतर पाकिस्तानची खुमखुमी थांबलेली नाहीये. बालाकोट आणि उरीच्या हल्ल्यानंतरही पाकिस्तानने असाच थयथयाट केला होता. पण यावेळचा हल्ला पाकिस्तानच्या वर्मी लागला आहे. त्यामुळेच पाकिस्तानने भारताविरुद्धची कारवाई तीव्र केली आहे. पाकिस्तानची ही युद्धाची खुमखुमी किती काळ कायम राहते यावरच दोन्ही देशांतील संघर्षाचे भवितव्य ठरणार आहे. संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार पाकिस्तानने ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वापर करून अवंतीपुरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, अमृतसर, कपूरथला, जालंधर, लुधियाना, आदमपूर, भटिंडा, चंदीगड नल, फलौदी, उत्तरलाई आणि भूज यांसारख्या उत्तरेकडील आणि पश्चिम भारतातील अनेक लष्करी ठिकाणांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. पण या हल्ल्यांना काऊंटर यूएएस ग्रीड आणि रशियामधून तयार केलेल्या एस-४०० हवाई संरक्षण प्रणालीद्वारे निष्क्रिय करण्यात आले. या हल्ल्यात वापरलेली उपकरणे आता भारतात विविध ठिकाणांहून जप्त केली जात आहेत.

भारताची एस-४०० सुदर्शन ही एअर डिफेन्स मिसाईल यंत्रणा जगातली सर्वात अत्याधुनिक लांब पल्ल्याची एअर डिफेन्स मिसाईल सिस्टीम मानली जाते. भारताने रशियाशी एकूण ५ एस-४०० चा करार केला आहे. त्यातील तीन भारतीय ताफ्यात आधीच दाखल झाली असून उर्वरित दोन २०२६ पर्यंत दाखल होण्याची शक्यता आहे. एस-४०० हवाई संरक्षण प्रणाली ६०० किलोमीटरपर्यंत हवाई धोक्यांवर लक्ष ठेवू शकते आणि लढाऊ विमान, बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आणि ड्रोन थांबवू शकते. एस-४०० सुदर्शन ही प्रणाली शत्रू राष्ट्राकडून येणारी विमाने, फायटर जेटस्, ड्रोन, क्रूझ आणि बॅलेस्टिक मिसाईल्स यांचा ४०० किलोमीटरच्या अंतरावरूनही माग काढून त्यांचा वेध घेऊ शकते.

पाकिस्तानने जम्मू-काश्मीरच्या कुपवाडा, बारामुला, उरी, पूँछ, मेंढर आणि राजौरी सेक्टरमध्ये कॅलिबर आर्टिलरीचा वापर करून नियंत्रण रेषेवर तुफानी मारा सुरू केला आहे. या हल्ल्यात एकूण १६ जणांचा मृत्यू झाला आहे. प्रत्युत्तरादाखल भारतीय सैन्याने लाहोरमधील पाकिस्तानची हवाई संरक्षण यंत्रणा उद्ध्वस्त केली आहे. यामुळे त्यांचे रडार निकामी झाले आहे.वास्तविक पाहता पाकिस्तानी सैन्याचे तोफखाने गोळाबारुदच्या कमतरतेचा सामना करत आहेत. पाकिस्तानाची युद्धक्षमता फक्त चार दिवसांपर्यंत मर्यादित राहिली आहे. रॉकेटस्चीही कमतरता पाकिस्तानला भेडसावत आहे. एप्रिल २०२५ मध्ये सोशल मीडिया पोस्टमध्ये असा दावा करण्यात आला होता की, पाकिस्तानच्या तोफखान्यासाठी महत्त्वाचे १५५ मिमी गोळे युक्रेनला पाठवले गेले असल्याने तेथील साठा कमी झाला आहे. दुसरीकडे भारतात दारूगोळा तयार करणार्या कारखान्यांमध्ये कामाची गती वाढवली गेली आहे. पाकिस्तानची ही युद्धाची खुमखुमी किती काळ कायम राहते यावरच दोन्ही देशांतील संघर्षाचे भवितव्य ठरणार आहे.यादरम्यान ९ मे हा दिवस या संघर्षाच्या दृष्टीनेच नव्हे तर पाकिस्तानच्या आगामी काळातील भविष्यासाठीही महत्त्वाचा ठरणार आहे. पहलगाम येथील अतिरेकी हल्ला आणि त्यानंतर ‘ऑपरेशन सिंदूर’मध्ये पाकिस्तानातील दहशतवादी ठिकाणांवर भारताच्या प्रत्युत्तरात्मक कारवाईनंतर भारत आता आंतरराष्ट्रीय पातळीवर पाकिस्तानला दिली जाणारी आर्थिक मदत थांबवण्याचा मुद्दा उचलत आहे. भारत आंतरराष्ट्रीय नाणेनिधीद्वारे पाकिस्तानला दिल्या जाणार्या दोन अब्ज डॉलर्सच्या मदतीला विरोध करणार आहे आणि ९ मे रोजी होणार्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत या विरोधात मतदान करू शकतो. असे झाल्यास पाकिस्तान अत्यंत गंभीर आर्थिक संकटात सापडू शकतो.आयएमएफच्या कार्यकारी मंडळात अनेक मोठ्या देशांचे प्रतिनिधित्व असून भारत त्यातील एक महत्त्वाचा सदस्य आहे. भारताच्या भूमिकेला इतर देशांचा पाठिंबा मिळाला, तर ही मदत थांबवली जाऊ शकते किंवा ती अत्यंत कठोर अटींसह मंजूर केली जाऊ शकते. यामध्ये अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स आणि इतर देशांची भूमिका निर्णायक ठरू शकते. भारताचा विरोध हा फक्त आर्थिक नसून तो एक धोरणात्मक आणि राजनयिक पाऊलसुद्धा आहे. या माध्यमातून भारत दहशतवादाचा मुद्दा जागतिक आर्थिक व्यासपीठांवरही उभा करू पहात आहे. आयएमएफमध्ये १९० देश सदस्य आहेत. भारतासोबत अमेरिका, फ्रान्स, जपान किंवा ब्रिटनसारखे देश आले, तर पाकिस्तानला ही मदत मंजूर होणे अवघड होईल.

पाकिस्तान आपली भूमिका बदलत नाही, तोवर आयएमएफची मदत ही दहशतवादाला अप्रत्यक्ष आर्थिक सहाय्य ठरू शकते, असा भारताचा दावा असणार आहे. नाणेनिधीमध्ये भारताची मतदान शक्ती मर्यादित असली, तरी भारताचा कूटनीतिक आणि नैतिक प्रभाव मोठा आहे. जर भारत इतर देशांना आपल्या भूमिकेला अनुकूलता दर्शवण्यासाठी तयार करू शकला, तर पाकिस्तानसाठी तो वज्राघात ठरणार आहे. कारण यामुळे पाकिस्तानची अर्थव्यवस्था आणखी ढासळेल. आयएमएफकडून होणारे फंडिंग हे अनेकार्थाने महत्त्वाचे असते. यावरून त्या देशाच्या आर्थिक धोरणांमध्ये स्थैर्य आहे, असे सूचित होत असते. पण आयएमएफने नकार दिल्यास वर्ल्ड बँक, आशियाई विकास बँक, इस्लामिक देश किंवा चीनसारख्या देशांकडून कर्ज मिळणेही पाकिस्तानला कठीण होईल. हा पैसा न आल्यास पाक सरकारला अनुदान कमी करावे लागेल आणि कर वाढवावे लागतील. यामुळे जनतेत रोष वाढेल, आंदोलनं आणि अस्थिरता संभवते. तसेच पाकिस्तानची आंतरराष्ट्रीय प्रतिमा आणखी खराब होईल. एफएटीएफसारख्या संस्था पाकविरोधात कठोर भूमिका घेऊ शकतात. तसेच यामुळे पाकिस्तानचा संरक्षणावर होणारा खर्च कमी होऊ शकतो. याचा थेट परिणाम राष्ट्रीय सुरक्षेच्या धोरणावर होईल.

## पावसाचा प्रत्येक थेंब साठवा

# यंदा वैयक्तिक शेततळे योजनेसाठी भरघोस निधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

राज्यातील शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना राज्यात ठराविक भागासाठी सुरू करण्यात आली.




ही योजना आता संपूर्ण राज्यभर सुरू केली आहे. या योजनेंतर्गत सूक्ष्म सिंचनास पूरक अनुदानाबरोबरच, वैयक्तिक शेततळे, शेततळ्याचे अस्तरीकरण, हरितगृह उभारणे व शेडनेट हाऊस उभारण्यासाठी अनुदान वितरित करण्यात येत आहे.

वर्ष २०२४-२५ मधील वित्त विभागामार्फत मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीच्या मर्यादेत मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेच्या ४०० कोटींच्या (सूक्ष्म सिंचनाकरिता पूरक अनुदान घटकासाठी ३०० कोटी व वैयक्तिक शेततळे घटकासाठी १०० कोटी कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

**अर्थसंकल्पीय प्रणालीवर वितरण**

१) वर्ष २०२४-२५ या वर्षात मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत वैयक्तिक शेततळे या घटकाकरिता ५२९.५० लक्ष (रुपये पाच कोटी एकोणतीस लाख पन्नास हजार मात्र) निधी आयुक्त (कृषी) यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरित करण्यात येत आहेत.

२) लाभार्थ्यांना अनुदान अदागयीची कार्यवाही महा-डीबीटी प्रणालीद्वारे करण्यात येणार आहे आणि लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर अनुदानाची रक्कम सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीद्वारे जमा केली जाणार आहे.

५२९ लक्ष निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. कृषी आयुक्तालयाकडून प्राप्त मागणी व सद्य:स्थितीत असलेल्या प्रलंबित दायित्वाच्या अनुषंगाने योजनेत तरतूद केली आहे.




## हार्ट टॅकचा धोका कमी करणाऱ्या ६ सवयी, बघा यापैकी काही सवयी तरी तुम्हाला आहेत का?

दि.९विदर्भ प्रजासत्ताक ५ कोलेस्टेरॉल, ट्रायग्लिसराईड वाढत असून हृदयविकाराचे प्रमाणही वाढले आहे. कमी वयात हार्ट अटॅक येण्याची कित्येक उदाहरणे आपण आपल्या सभोवती पाहातो. त्यामुळेच हृदयविकाराचा धोका कमी करायचा असेल तर काही गोष्टी करणं आवश्यक आहे त्या गोष्टी नेमक्या कोणत्या ते पाहूया..



**हार्ट अटॅकचा धोका कमी करणाऱ्या ३ सवयी**

हृदयविकाराचा धोका कमी करून हृदय मजबूत ठेवायचे असेल तर कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत आणि कोणत्या टाळल्या पाहिजेत, याविषयीची माहिती डॉ. अशोक सेठ यांनी इंडिया टीवी स्पीड न्यूज वेलनेस वीकेंड या कार्यक्रमात दिली आहे. यामध्ये डॉक्टरांनी सांगितलेल्या काही महत्त्वाच्या गोष्टी पुढीलप्रमाणे...

१. दिवसाची सुरुवात ब्रेड, बिस्किटे अशा पदार्थांनी करणे पुर्णपणे सोडून द्या. पिझ्झा, बर्गर असे पदार्थ तुमच्या आहारात अजिबात नको. नियमितपणे सकस, पौष्टिक आहार घ्या.

२. तेल, साखर, फॅट्स, जास्त कॅलरी असणारे पदार्थ, तळलेले तेलकट पदार्थ कमीतकमी प्रमाणात खा. त्या तुलनेत मात्र आहारातले प्रोटीन्सचे, हिरव्या पालेभाज्यांचे प्रमाण वाढवा. चहाचे प्रमाणही कमी करा.

३. एकदम पोटभर जेवण्यापेक्षा थोडं थोडं करून दिवसातून ३- ४ वेळेला खा. ते पचायला आणि हृदयाच्या आरोग्यासाठी जास्त चांगलं असतं.

४. रोजच्या स्वयंपाकासाठी मोहरीचं तेल अधिक चांगलं असतं असं डॉक्टर सांगतात. शिवाय कोणतंही तेल वापरत असाल तरी ते कमीतकमी प्रमाणात खा. रिफाईंड तेल खाणं टाळा. तसेच आहारातून गव्हाचे प्रमाणही कमी करा.

५. दिवसातून ३० ते ४० मिनिटे चालण्याचा व्यायाम करणे हृदयासाठी अधिक चांगले ठरते. शरीर जास्तीतजास्त क्टीव्ह ठेवा.

६. जास्त ताण घेऊ नका. स्ट्रेस कमी करण्यासाठी योगा, मेडिटेशन करा. नियमितपणे व्यायाम केल्यानेही मानसिक, शारिरीक ताण कमी होतो.

# यंदाच्या खरीपात सोयाबीनच्या अधिक उत्पादनासाठी टॉप १० जाती कोणत्या? जाणून घ्या सविस्तर

**दि.९ विदर्भ प्रजासत्ताक**

आपल्या राज्यात लागवडीसाठी शिफारस केलेल्या सोयाबीनच्या सुधारित वाणांची माहिती पुरविण्याच्या उद्देशाने तसेच या पिकाचे चांगले उत्पादन घेण्यासाठी पेरणी करण्यापूर्वी शेतकर्यांनी कोणते वाण निवडावेत.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**महाराष्ट्रात लागवडीसाठी शिफारस केलेल्या सोयाबीनच्या सुधारित जाती**

१) एम ए सी एस १४६० (च-उड १४६०)

८९-९१ दिवसांत पक्व होणारा वाण.

**फुलांचा रंग: पांढरा.**

जास्त उत्पादन क्षमता: २२-३८ क्विं./हे.

शेंगा फुटण्यास प्रतिरोधक.

विविध किडी व रोगांना मध्यम प्रतिबंधक.

मध्य व पश्चिम महाराष्ट्रात लागवडीस योग्य.

२) एम ए सी एस १५२० (च-उड १५२०)

जास्त उत्पादन क्षमता: २१-२९ क्विं./हे.

**फुलांचा रंग: जांभळा.**

कालावधी: १०० दिवस.

शेंगा फुटण्यास प्रतिरोधक.

प्रकाश व उष्णतेस असंवेदनशील.

मराठवाडा व विदर्भात लागवडीस योग्य.

**३) एमएसीएस एनआरसी १६६७**

कुणीत्झ ट्रिप्सिन इन्हीबीटर मुक्त (घढख षीशश) वाण.

एमएसीएस ४५० या जुन्या वाणाचा मुलत: व्युत्पन्न वाण (Essentially Derived Variety)

उत्पादन क्षमता: २०-२१ क्विं./हे.

फुलांचा रंग: जांभळा.

कालावधी: ९६-९८ दिवस.

सोया खाद्य पदार्थ व पशु खाद्य उद्योगासाठी उपयुक्त.

पश्चिम महाराष्ट्र व दक्षिण भारतात लागवडीस योग्य.

**४) के डी एस ९९२ (फुले दूर्वा)**

अधिक उत्पादनक्षमता: २५-३० क्विं./हे.

कालावधी: १०० ते १०५ दिवस.

फुलांचा रंग: जांभळा.




तांबेरा रोगास प्रतिबंधक.

शेंगा फुटण्यास प्रतिबंधक.

दक्षिण महाराष्ट्रात लागवडीस योग्य.

**५) के डी एस ७५३ (फुले किमया)**

उत्पादन क्षमता: २५-३० क्विं./हे.

फुलांचा रंग: जांभळा.

कालावधी: १०० ते १०५ दिवस.

तांबेरा रोगास प्रतिबंधक.

दक्षिण महाराष्ट्रात लागवडीस योग्य.

**६) एम ए सी एस ११८८ (च-उड ११८८)**

जास्त उत्पादन क्षमता: २५-३५ क्विं./हे.

फुलांचा रंग: पांढरा.

कालावधी: १०५-११० उत्पादन क्षमता: ३२-३५ क्विं./हे.

फुलांचा रंग: जांभळा.

कालावधी: ९३ ते ९८ दिवस.

शेंगा फुटण्यास प्रतिबंधक.

विविध रोग व किडींना प्रतिबंधक.

विदर्भ व मराठवाडा विभागात लागवड शिफारस.

**८) एम ए यु एस ७२५**

उत्पादन क्षमता: २५-३१.५ क्विं./हे.

फुलांचा रंग: जांभळा.

कालावधी: ९० ते ९५ दिवस.

२० ते २५ टक्के शेंगामध्ये चार दाणे येतात.

विविध रोग व किडींना मध्यम प्रतिबंधक.

मराठवाडा व विदर्भात लागवडीसाठी शिफारस.

**९) पिडीकेव्ही अंबा (ए एम एस १००-३९)**

फुलाचा रंग: जांभळा.

परिपक्वतेचा कालावधी: ९४-९६ दिवस.

उत्पादकता: २८-३० क्विंटल/हेक्टर.

मुळकुज/खोडकुज या रोगास मध्यम प्रतिकारक.

शेंगा फुटण्यास प्रतिबंधक.

मुळावर रायझोबियमच्या गाठींचे व गाठींमध्ये लेग-हीमोग्लोबिनचे प्रमाण जास्त.

**१०) ए एम एस १००१ (पीडी केव्ही येलो गोल्ड)**

उत्पादन क्षमता: २२-२६ क्विं./हे.

फुलांचा रंग: जांभळा.

कालावधी: ९५ ते १०० दिवस.

मुळकुज/खोडकुज व पिवळा मोझॅक या रोगांस मध्यम प्रतिकारक.

विदर्भ व मराठवाडा विभागामध्ये लागवडीस योग्य.

**- श्री. एस. ए. जायभाय**

शास्त्रज्ञ ड - कृषि विद्यावेत्ता

अखिल भारतीय समन्वयित सोयाबीन संशोधन प्रकल्प, आघारकर संशोधन संस्था, पुणे

# डाक विभागाची ज्ञान पोस्ट सेवा

## विद्यार्थी, साहित्यिक, शैक्षणिक संस्था, प्रकाशक, पुस्तकं विक्रेता, यांच्यासाठी ही योजना उपयुक्त ठरणार


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

प्रसिद्धी च्या दृष्टीने उपेक्षित ठरलेल्या भारतीय डाक विभागाने अलीकडे कात टाकली आहे.अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन विविध सेवा सुरु केल्या आहे. यामुळे डाक विभाग आणि कार्यालयापासून दुरावलेले ग्राहक, नागरिक पुन्हा या विभागाशी जुळल्याचे सुखद चित्र आहे.

डाक विभागाने पोस्ट बँक, दिवाळीचा फराळ देश विदेशात पोहोचवणे, विस्तारित पार्सल सेवा सारख्या योजना सुरु केल्या. बदलत्या काळानुसार नवनवीन योजना, सेवा नागरिकांच्या सेवा देत आहे. त्याचाच एक भाग म्हणून डाक विभागातर्फे १ मे रोजी अर्थात महाराष्ट्र दिनाच्या शुभ मुहूर्तावर ज्ञान पोस्ट ही नवीन सेवा सुरु करण्यात आली आहे. अमरावती जिल्ह्यातही ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. विध्यार्थी, साहित्यिक, शैक्षणिक संस्था, प्रकाशक, पुस्तकं विक्रेता, ठोक विक्रेता यांच्यासाठी ही योजना उपयुक्त ठरणार आहे. तसेच इतर संस्था, संघटना यांच्यासाठी ही योजना फायदेशीर ठरण्याची चिन्हे आहेत.

डाक विभागाने पोस्ट बँक, दिवाळीचा फराळ देश विदेशात पोहोचवणे, विस्तारित पार्सल सेवा सारख्या योजना सुरु केल्या. बदलत्या काळानुसार नवनवीन योजना, सेवा नागरिकांच्या सेवा देत आहे. त्याचाच एक भाग म्हणून डाक विभागातर्फे १ मे रोजी अर्थात महाराष्ट्र दिनाच्या शुभ मुहूर्तावर ज्ञान पोस्ट ही नवीन सेवा सुरु करण्यात आली आहे.

या सेवांतर्गत डाक विभागाच्या ग्राहकांना पुस्तक, शैक्षणिक साहित्य रास्त दरात पाठविता येणार आहे.




आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. ९ मे २०२५

शहर/ग्रामिण




# घरी बसणाऱ्याला लोक मतदान करीत नाहीत

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उद्धव ठाकरेंवर टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

लोकशाहीमध्ये बहुमताला महत्त्व असते. त्यामुळेच धनुष्यबाण हे पक्षचिन्ह आपल्याकडे आहे. ते जनतेच्या न्यायालयात गेले, जनतेने त्यांना कायमचे घरी बसवले. घरी बसणाऱ्याला लौक मतदान करीत नाहीत. आता नेते युरोपात आणि कार्यकर्ते कोमात आहेत, अशी टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा नामोल्लेख न करता केली.

येथील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात गुरूवारी सायंकाळी शिवसेना शिंदे गटाच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. या मेळाव्याला मंत्री उदय सामंत, संजय शिरसाट, संजय राठोड, आशीष जयस्वाल, माजी खासदार आनंदराव अडसूळ, माजी आमदार अभिजीत अडसूळ आदी उपस्थित होते.

आमच्या पक्षाने विधानसभा निवडणुकीत ८० जागा लढवल्या आणि ६० जागा जिंकल्या, पण जे सांगत होते, आम्ही एकही जागा जिंकणार नाही, ते शंभर जागा लढले आणि केवळ २० ठिकाणी जिंकले. अत्यंत कमी मतांनी आमचा सात-आठ जागांवर पराभव झाला, अन्यथा यापेक्षाही कमी जागा त्यांना मिळाल्या असत्या असे शिंदे म्हणाले.एकनाथ शिंदे म्हणाले, आमचे कायकर्ते हे जनसेवेसाठी लोकांच्या दारात आहेत. कार्यकर्ता हा लोकांच्या दारात शोभून दिसतो, असे बाळासाहेब ठाकरे म्हणायचे. त्यांचेच विचार घेऊन आम्ही पुढे जात आहोत. आम्ही 'शासन आपल्या दारी' ही योजना घेऊन आलो. ५ कोटी लोकांनी त्याचा लाभ घेतला. पण, काही लोक घराच्या बाहेर पडत नाहीत आणि पडले, तर थेट विदेशातच जातात, असा टोला शिंदे यांनी लगावला.उद्धव ठाकरे यांच्या युरोप दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी ही टीका केली. एकनाथ शिंदे म्हणाले, माजी आमदार दिवंगत संजय बंड हे सच्चे शिवसैनिक होते. पण, त्यांना काय मिळाले. एखादा कार्यकर्त्याला धुळीला कसे मिळवायचे, याचे क्लासेस जर लावयाचे असतील, तर मुंबईमध्ये बांद्रा येथे एकच ठिकाण आहे. आमची कुठेही शाखा नाही, असे ते मिश्कीलपणे म्हणाले.संजय बंड यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या पत्नी प्रीती बंड यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहायला हवे होते, पण ताटातले काढून, वाटीतले काढून घ्यायचे ही सवयच काही लोकांना लागलेली आहे. पण आता प्रीती बंड यांनी पदर खोचलेला आहे. हातात धनुष्यबाण घेतलेला आहे. आता तुम्हाला पुर्वीचा अनुभव येणार नाही. तुमच्या पाठीशी एकनाथ शिंदे खंबीरपणे उभा आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

संजय बंड हे मोठं नावजीवनातील नवीन सुरुवात असून आज महत्त्वाचा दिवस आहे. शिवसेना शिंदे गटात येण्याकरिता विचार करायला वेळ लागला नाही. कारण बाळासाहेबांचे विचार मनात रुजलेले आहेत. संजय बंड हे विद्यार्थी सेनेपासूनच कार्यरत होते. – पंधरा वर्षे आमदार राहिले. शिवसेना बळकट केली. प्रीती बंड मोठं नाव नाही मात्र संजय बंड या नावाची संपूर्ण जिल्ह्यात छाप आहे. त्यांचं वलय मोठ आहे, असे प्रीती बंड यांनी पक्षप्रवेश केल्यानंतर सांगितले.

### शिंदे एकनाथ नाहीत तर लोकनाथ : आनंदराव अडसूळ

अभिजीत अडसूळ यांना काही लोकांमुळे पराभव पत्करावा लागला. मलाही हरवल्या गेले. आता जिल्ह्यात शिवसेनेचा लोकप्रतिनिधी नाही, ही खंत आहे. प्रीती बंड निवडून येणार असं वातावरण होतं. त्यांनी ६५ हजार मते घेतली. प्रीती बंड यांचं धनुष्यबाण चिन्ह असतं तर त्या नक्कीच निवडून आल्या असत्या. तळागळातील माणसाला न्याय देणारं नेतृत्व एकनाथ शिंदे आहेत ते एकनाथ नाहीत तर लोकनाथ असल्याचे प्रतिपादन माजी खासदार तथा अनुसूचित जाती जमाती समितीचे अध्यक्ष आनंदराव अडसूळ यांनी केले.

### महायुतीचा झेंडा फडकवा

राज्यात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या निवडणुका असून कार्यकर्त्यांच्या निवडणुकाकरिता नेत्यांनी सज्ज व्हावे व महायुतीचा झेंडा फडकवा, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी शिवसैनिकांना केले. पाकिस्तानला धडा शिकवण्याची गरज आहे. भारतीय सैन्याने गोळीचा जवाब मिसाइलने दिला आहे. पाकिस्तान पोकळ घोषणा करीत आहे. पाकिस्तानच्या बुडाखाली काय जळत आहे, ते त्यांनी पहाव. आता पूर्वीचा भारत राहिला नाही. पाकड्यांना घुसके मारणारा भारत आहे. पाकिस्तानबद्दल देशात उद्रेक व बदल्याची भावना होती. देश पाठीशी उभा आहे. भारताच्या हल्ल्यात केवळ दहशतवादी मारले गेले, अतिरेकी अड्डे उध्वस्त केले. यापुढेही जे काही होईल ते देशाच्या भल्यासाठी व रक्षणासाठी होणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.


# इस्कॉन मंदिरात आज श्री रुक्मिणी द्वादशी महोत्सव

## लोकनाथ स्वामींच्या उपस्थितीत सकाळी ४.३० पासून विविध कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती** – अमरावतीच्या इस्कॉन मंदिरात २५ व्या ब्रह्मोत्सवानिमित्त श्री रुक्मिणी द्वादशी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. इस्कॉनचे वरिष्ठ संन्यासी व कीर्तन सम्राट लोकनाथ स्वामी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात पहाटे ४.३० वाजता श्री श्री रुक्मिणी द्वारकाधीश यांच्या शुभमंगल आरतीने होईल. त्यानंतर हरे कृष्ण महामंत्राचा सामूहिक जप होणार आहे. लोकनाथ स्वामी महाराज श्री रुख्मिणी कथेचे कथन करतील. सकाळी ७.३० वाजता दर्शन आरती व गुरुपूजा होईल.

सायंकाळी ६ वाजता संकीर्तनासह श्री श्री रुक्मिणी द्वारकाधीश यांचा महाअभिषेक होईल. इस्कॉन भक्त प्रल्हाद स्कूलच्या विद्यार्थी श्री रुख्मिणी



जन्मोत्सवावर आधारित नाटिका सादर करतील.

११ मे रोजी श्री नृसिंह चतुर्दशी महोत्सव साजरा होणार आहे. या दिवशी पहाटे ४.३० पासून विविध धार्मिक कार्यक्रम होतील. सायंकाळी ६ वाजता श्री श्री लक्ष्मी नृसिंह व प्रल्हाद यांचा महाअभिषेक वरिष्ठ ब्रह्मचारी भक्तांद्वारे होईल. भक्त प्रल्हाद स्कूलचे विद्यार्थी श्री नृसिंह प्रागट्य लीलेवर आधारित नाटिका सादर करतील. श्रीमान अनंतशेष प्रभुजी श्री नृसिंह प्रल्हाद कथा सांगतील. ५६ भोग दर्शन व महाआरतीनंतर दोन्ही दिवसांच्या कार्यक्रमांची सांगता महाप्रसादाने होईल.

# उद्योगांसाठी लवचिक उद्योग धोरण राबविणार-उद्योग मंत्री उदय सामंत

## मोझरी चौथे पुस्तकाचे गाव साकारणार

***विदर्भ प्रजासत्ताक***
***दि.९अमरावती***



अमरावती येथील टेक्सटाईल पार्कमध्ये उद्योगांना चांगल्या सेवा पुरविण्यात येत आहे. आता याठिकाणी पीएम मित्रा टेक्सटाईल पार्क उभारण्यात येणार आहे. या पार्कमध्ये उद्योग यावेत, यासाठी जमिनीचे दर एक वर्षासाठी ६०० रूपये ठरविण्यात आला आहे. उद्योगांसाठी लवचिक धोरण राबविणार असल्याची माहिती उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज श्री. सामंत यांनी उद्योजकांच्या समस्यांबाबत बैठक घेतली. यावेळी जिल्हाधिकारी सौरभ कटियार, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव यांच्यासह उद्योग विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

श्री. सामंत यांनी, पीएम मित्रा टेक्सटाईल पार्कमध्ये ५ उद्योजकांनी १३०० कोटी रूपयांचे करार केले. मात्र जमिनीच्या दराबाबत प्रश्न असल्याने उद्योग सुरू होण्यास अडचण झाली. यावर उपाययोजना म्हणून आता एक वर्षासाठी ६०० रूपये दर ठरविण्यात आला आहे. त्यामुळे याठिकाणी उद्योग सुरू होण्यास वेग येईल. त्यासोबतच सामाईक सोयीसुविधांचे दर ६७ रूपयांवर आणण्यात आले आहे. यात अधिकच्या दराबाबतही ५० टक्के सवलत देऊन प्रलंबित रक्कम उद्योजकांकडून भरून घेतली जाणार आहे. या प्रकल्पामधून १० ते २० हजार रोजगार निर्मिती होणार आहे.

उद्योगांशी करार करण्यात आल्यानंतर ६८ टक्के उद्योग सुरू करण्यात आले आहे. उद्योगांना सहकार्याची भूमिका शासनाने घेतली आहे. मात्र उद्योगांसाठी जमिन घेऊन उद्योग सुरू केला नसल्यास जमिनी परत घेतल्या जातील. येत्या काळात अमरावतीमध्ये आयटी पार्क, लघू व मध्यम उद्योजक पार्क यासोबतच आमझरी हे मधाचे गाव म्हणून साकारण्यात येणार आहे. उद्योजकांना चांगल्या सोयी सुविधा देण्यासाठी शासनाचा पुढाकार राहणार आहे.

गुरूकुंज मोझरी येथे राज्यातील चौथे पुस्तकाचे गाव निर्माण करण्यात येणार आहे. यात ३५ कुटुंबांचा समावेश करण्यात येणार आहे. या कुटुंबांनी खानपानाचा परवाना काढल्यास पर्यटकांना चहा, नास्ता आणि जेवण, तसेच होमस्टेची सुविधा देऊ शकतील. याठिकाणी उत्कृष्ट आणि दुर्मिळ पुस्तके उपलब्ध राहणार आहे. त्यासोबतच येत्या सत्रापासून मराठी भाषा विद्यापिठात अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असल्याचे श्री. सामंत यांनी सांगितले.

# सिलिंडरमुळे नांदगाव तालुक्यातील अंगणवाड्या धूरमुक्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नांदगाव खंडे–** येथील पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी डॉ. स्नेहल शेलार यांच्या पुढाकाराने तालुक्यातील संपूर्ण अंगणवाडी केंद्रांना सिलिंडर व शेगडीचे वितरण करण्यात आले. या वितरणामुळे हा तालुका धूरमुक्त बनला असून, जिल्ह्यात तसा बहुमान मिळवणारा तो पहिला तालुका ठरला आहे.

पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर अंतर्गत एकूण १६५ अंगणवाड्या संचालित केल्या जातात. या सर्व अंगणवाडी केंद्रांना ग्रामपंचायतीने त्यांच्या उत्पन्नातील १० टक्के रक्कम महिला व बाल विकास यांच्या कल्याणासाठी राखीव ठेवायला सांगितली आहे. तसा राज्य शासनाचा नियमही आहे. या राखीव निधीतूनच सर्व अंगणवाडी केंद्रांना सिलिंडर व शेगडी पुरवण्यात आली. दरम्यान प्रत्येक अंगणवाडी केंद्राला गॅस सिलिंडर आणि शेगडी संचाचे वाटप केल्यामुळे नांदगाव खंडेश्वर तालुका हा जिल्ह्यातील पहिला धूरमुक्त अंगणवाडी असलेला तालुका म्हणून गौरवण्यात आला आहे. याचे श्रेय बीडीओ डॉ. स्नेहल शेलार, सहायक गटविकास अधिकारी संजय झंझाड, पं. स.चे अधिकारी, कर्मचारी आणि निधी राखून महिला व बालविकासाला हातभार लावणारे तालुक्यातील सर्व गावांचे सरपंच व ग्रा. पं. अधिकारी यांना जाते.



पं. स. अंतर्गत एकूण १२९ गावे असून ६८ ग्रा. पं.च्या कार्यक्षेत्रातत एकूण १६५ अंगणवाडी केंद्र आहेत. ग्रा. पं.ची कर वसुली करून त्यामध्ये महिला व बालकांचे कल्याण या अंदाजपत्रकावरील बाबीनुसार सर्व अंगणवाडी केंद्रांना गॅस सिलिंडर आणि शेगडी संचाचे वाटप करण्याचे शिस्तबद्ध नियोजन विठ्ठल जाधव व नीलेश ठाकरे या दोन विस्तार अधिकाऱ्यांनी केले आहे. या सर्व ग्रा. पं.ना मासिक सभा ठरावाद्वारे अंगणवाडी केंद्रातील लहान बालकांना आहार शिजवताना चुलीमुळे धुराचा त्रास होत होता. त्यामुळे सर्व अंगणवाड्या धूरमुक्त करण्याबाबत जाणीव जागृती करण्यात आली. त्यानंतर ग्रा. पं.ची राखीव १० टक्के रक्कम महिला व बालकल्याण निधी अंतर्गत ठेवण्यात आली.या यशस्वी कामकाजासाठी सर्व सरपंच, उपसरपंच, सदस्य व ग्रा. पं. अधिकारी यांनी योगदान दिले. या सर्वांचे बालविकास विभागाच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

# आंबा-मिलेट महोत्सवातून ग्राहक, उत्पादकांना लाभ होणार-जिल्हाधिकारी सौरभ कटियार

## आंबा मिलेटस् महोत्सवाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती:** कृषी पणन मंडळातर्फे आंबा व मिलेटस् हा चांगला महोत्सव राबविण्यात येत आहे. यामुळे उत्पादकांना ग्राहक मिळण्यासोबतच ग्राहकांनाही उत्कृष्ट उत्पादन मिळणार आहे. त्यामुळे नागरिकांनी या महोत्सवाला भेट द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.महोत्सवाचे उद्घाटन प्रथम येणाऱ्या ग्राहकाच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी सौरभ कटियार उपस्थित होते. यावेळी सहकारी संस्था सहनिबंधक चैतन्य नसाणे, जिल्हा उपनिबंधक श्री. कुंभार उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री. कटियार म्हणाले, कृषी पणन मंडळाचा उपक्रम स्तुत्य असून यामध्ये मध्यस्तांची संख्या कमी होऊन शेतकरी आणि प्रक्रियादार हे ग्राहकांच्या जवळ येतील. यामुळे ग्राहकांना आवश्यक असणाऱ्या उत्पादनाची जाणीव शेतकऱ्यांना होईल. आंबा महोत्सवामुळे हापूस, केशर आणि गावरान आंब्याला चांगली



बाजारपेठ उपलब्ध होण्यासोबतच ग्राहकांनाही चांगल्या दर्जाचा आंबा उपलब्ध झाला आहे. शेतकरी आणि शेतकरी उत्पादक कंपनी प्रक्रियादार यांना मिलेट आणि हापूस, केशर, गावरान आंबा या फळांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी राज्य कृषी पणन मंडळातर्फे आंबा मिलेटस महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. दि. १२ मेपर्यंत हा महोत्सव जाधव पॅलेस येथे सुरू राहणार आहे. यात ४५ उत्पादक आणि कंपन्यांनी सहभाग घेतला आहे.पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक दिनेश डागा यांनी वीस वर्षापासून विविध महोत्सव आयोजित करून शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच केंद्र शासनाच्या मिलेट धोरणानुसार ज्वारी, बाजरी, भगर, नाचणी आदी मिलेटसला बाजारपेठ उपलब्ध व्हाव्यात यासाठी महोत्सव घेण्यात येते. महोत्सवाला नागरिकांनी भेट द्यावी,असे आवाहन केले आहे.

# विद्युत विभागाचे सहायक अभियंताला १६ हजाराची लाच स्वीकारतान अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अचलपूर** – विद्युत केंद्रातर्गत सोलर पॅनल बसविण्यासाठी आवश्यक कागदपत्राकरिता १६ हजार रूपयांची लाच स्वीकारताना सहायक अभियंता भारत सिडाम यांना लाचलुचपत अटक केली. परतवाड्यातील जय भवानी हॉटेलमध्ये गुरूवारी (दि. ८) दुपारी १.४० वाजताच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.

ए. आर. कौशल सोलर (ओ.पी.सी.) प्रायव्हेट लिमिटेड या नावाची कंपनी आहे. या कंपनीला धारणी येथे सोलर पॅनल बसविण्याचा कंत्राट मिळाला. धारणी येथील चार ग्राहकांकडे हे पॅनल बसवायचे होते. त्यासाठी धारणीच्या विद्युत विभागात मिटर रिलिज करणे, मिटर रिलीज ऑर्डर काढणे आणि तपासणी अहवालमिळण्याकरिता अर्ज दाखल करण्यात आला होता. याबाबतचे अहवाल देण्यासाठी धारणीच्या विद्युत विभागाचे सहायक अभियंता भारत सिडाम यांनी प्रत्येक ग्राहकामागे ५ हजार रूपये याप्रमाणे २० हजार रूपयांची मागणी केली होती.




त्यानंतर परतवाडा भेटण्यासाठी बोलाविले. त्यानुसार १६ हजार रूपयांची लाच स्वीकारताना सहायक अभियंता भारत सिडाम यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात अटक केली.परतवाडा प्रतिबंधक विभागाने रंगेहात येथील घटना येथील जय भवानी हॉटेलमध्येया कारवाईत लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक अभय आष्टेकर, मंगेश मोहोड, हवालदार युवराज राठोड, राजेश मेटकर, अंमलदार आशिष जांभोळे, गोवर्धन नाईक व राजेश बहिरट या कर्मचाऱ्यांचा समावेश होता.


शेतकरी ते थेट ग्राहक

**कामधेनु नॅचरल्स**

उत्तम आहार सर्वोत्तम जीवन

विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी

समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती

नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०


# कारला येथे बोगस डॉक्टर पकडला

## पदवीशिवाय ॲलोपॅथीची केली जात होती प्रॅक्टीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती–** १२वैद्यकीय व्यवसायाची कोणतीही पदवी नसतानाही डॉक्टर असल्याचे भासवून वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या एका बनावट डॉक्टरला चांदूररेल्वे आणि तिवसा तहसीलच्या आरोग्य विभागाने कारला गावात रंगेहाथ पकडले. २ मे रोजी केलेल्या कारवाईदरम्यान, सुजल समर्थ विश्वास (३५, कारला, ता. चांदूररेल्वे) हा बनावट डॉक्टर रुग्णाला सलाईन देताना पकडला गेला. त्यानंतर, चांदूररेल्वे तहसील अधिकारी डॉ. प्रियांका निकोसे यांच्या तक्रारीवरून, कुऱ्हा पोलिसांनी बनावट डॉ. सुजल विश्वास यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल केला.

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, कारला गावात खोलीभाड्याने घेऊन सुजल विश्वास यांच्याकडून चालवल्या जाणाऱ्या बेकायदेशीर व्यवसायावर तहसील आरोग्य अधिकारी डॉ. प्रियांका निकोसे यांनी चांदूर रेल्वे आणि तिवसा तहसील आरोग्य विभागाच्या पथकासह २ मे रोजी छापा टाकला. यावेळी सुजल विश्वास यांनी एका रुग्णाला सलाईन लावले चौकशीदरम्यान असे आढळून आले की, सुजल विश्वासकडे वैद्यकीय व्यवसायाशी संबंधित कोणतीही पदवी नाही. शिवाय, त्याच्या बनावट दवाखान्यात कोणताही बोर्ड लावलेलानव्हता. बनावट डॉक्टरांच्या क्लिनिकमधून सलाईन, ॲलोपॅथिक औषधे आणि इंजेक्शन्सचा साठाही जप्त करण्यात आला. विशेष म्हणजे २०२२ मध्ये बनावट डॉक्टर सुजल विश्वास यांच्याविरुद्धही तक्रार आली होती. सुजल विश्वास यांना माहिती मिळताच त्यांनी त्यांचे बेकायदेशीर काम बंद केले आणी कारला गावातून पलायन केले.याची माहिती आरोग्य विभागाला विस्तार अधिकाऱ्यांमार्फत मिळाली. यासोबतच आशा, एमपीडब्ल्यू एएनएम, आणि उपकेंद्र कर्मचाऱ्यांनीही सुजल विश्वास यांच्या बेकायदेशीर कारवायांची माहिती आरोग्य विभागाला दिली.

# बाप बाप होता है! गेल्या २४ तासांत कंगाल पाकिस्तानचं काय काय नुकसान झालं?

## भारतीय सैन्याने पाकची केली पळता भुई थोडी!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९लाहोर** पाकिस्ताननं जम्मू काश्मीरमध्ये एलओसीवर रात्रभर जोरदार गोळीबार केला. त्याला भारतानेही चोख प्रत्युत्तर दिलं. भारताने केलेल्या भडीमारात पाकिस्तानी चौक्या अक्षरशः भाजून निघाल्या. दक्षिण काश्मीरमधील पूंछ, राजौरी, सांबा सेक्टरमध्ये एलओसीवर पाकिस्तानचा रात्रभर तोफांचा भडीमार सुरू होता. तो अजूनही सुरूच आहे. पाकिस्तानच्या गोळीबाराला भारतानेही तोडीस तोड उत्तर दिलं. पाकिस्तानातल्या १६ शहरांवर भारतानं जोरदार प्रतिहल्ला करत हाहाकार माजवला. अनेक शहरांमध्ये ब्लॅक आऊट ठेवण्याची वेळ पाकड्यांवर आली. पाकिस्तानातल्या महत्त्वाच्या कराची (घरीरलहळ झ्रीीं) बंदरावर देखील भारतीय नौदलानं हल्ल्यामागून हल्ले केले. १४ पेक्षा जास्त स्फोटांनी कराची बंदर हादरून गेलं. तसेच कराची बंदराचे मोठे नुकसान झाल्याचे सांगितलं जात आहे. भारतीय नौदलाच्या धडक कारवाईनंतर घाबरगुंडी उडालेल्या पाकिस्ताननं कराची बंदरात ब्लॅकआऊट केलं. १९७१ नंतर पहिल्यांदाच भारतीय नौसेनेनं पाकिस्तानच्या कराची बंदराला टार्गेट केलं.

पाकिस्तान कुठे कुठे तोंडावर आपटला?

- भारतावर ड्रोन हल्ले केले, पण सगळे अपयशी ठरले
- लढाऊ विमाने पाठवली, एकही यशस्वी झालं नाही
- चार लढाऊ विमाने भारताने लगोलग पाडली
- कराची पोर्ट उद्धवस्त
- राजधानी इस्लामाबादेत हल्ले
- पंतप्रधानाच्या घराबाहेर हल्ले, बंकरमध्ये लपण्याची वेळ
- लाहोरमधील हल्ल्यांनी लाज काढली
- पाक सैन्यप्रमुखावरच देशद्रोहाचा खटला



- बलुचिस्तानने पाकिस्तानच्या ३ भागांवर कब्जा केला
- बलुचिस्तानातील चौक्या सोडून पळून जाण्याची वेळ

भारतानं पाकिस्तानचं सर्वाधिक ताकदीचं लढाऊ विमान पाडलं–

भारताला ताकद दाखवण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाकिस्तानच्या हवाई दलाची भारतानं झोप उडवलीय. भारतानं पाकिस्तानची तीन लढाऊ विमानं गारद केली. चीननं दिलेले पाकिस्तानचे दोन जेएफ १७ आणि अमेरिकेच्या एका एफ १६ विमानाचा भारतीय हवाई दलानं लक्ष्यभेद केला. भारतानं तीन विमानं पाडल्याची कबुली पाकिस्ताननंच्या सैन्य अधिकाऱ्यांनी दिलीय. पाकिस्तानसाठी हा मोठा धक्का असल्याचंही त्यांनी मान्य केलंय. एफ १६ विमानं अमेरिकेनं पाकिस्तानला दिलेत.

## शेवटी रशियाच कामाला आला, पाकिस्तानचा हमास स्टाईल हल्ला हवेतच थोपविला



**S-४०० डील झाली नसती तर...**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९नवी दिल्ली–** पाकिस्तानने सलग दोन रात्री भारतावर ड्रोन, मिसाईल आणि लढाऊ विमानांनी भारतावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला आहे. शेकडो आत्मघाती ड्रोन, मिसाईल आणि लढाऊ विमाने पाडण्यात भारताने रशियाकडून खरेदी केलेल्या ड–४०० ची मोठी भूमिका राहिली आहे. ही डील झालीच नसती तर आज भारताचे प्रचंड नुकसान झाले असते. भारताने विकसित केलेल्या डिफेन्स सिस्टीमदेखील हा हल्ला परतवण्यासाठी वापरण्यात आल्या आहेत.रशियाची एअर डिफेन्स सिस्टीम खरेदी करण्याच्या भारताच्या प्रयत्नांत अमेरिकेने खोडा घालण्याचा प्रयत्न केला होता. अमेरिकेला त्यांची एअर डिफेन्स सिस्टीम भारताच्या गळ्यात मारायची होती. यासाठी अमेरिकेने रशियाची डिफेन्स सिस्टिम खरेदी न करण्यासाठी भारतावर निर्बंध घालण्याचा आणि दबाव टाकण्याचा प्रयत्न केला होता. परंतू, भारताने अनेक दशकांपासूनचा पाठीराखा असलेल्या रशियाचीच सिस्टीम खरेदी केली. यामुळे अमेरिका नाराज झाला होता.

रशिया वेळोवेळी भारताच्या मदतीला धावून आला आहे. बांगलादेश स्वतंत्र करण्याच्या युद्धावेळीदेखील अमेरिका भारतावर चाल करून येत होता. रशियाला समजताच रशियाने अमेरिकेच्या जपानहून निघालेल्या विमानवाहू युद्धनौकेचा पाठलाग सुरु केला. आपल्या युद्धनौका मागचा पुढचा विचार न करता अमेरिकेच्या मागे लावल्या. यामुळे अमेरिकेच्या युद्धनौकेला भारतावर हल्ला करणे जमले नाही आणि पाकिस्तानने मदत मिळाली नाही म्हणून शरणागती पत्करली होती. यापूर्वीही अनेकदा अमरिकेने भारताच्या पाठीत खंजीर खुपसला आहे, वेळोवेळी पाकिस्तानची बाजू घेत त्यांना मदत केली आहे.

जर भारताने अमेरिकेच्या दबावाला झुगारून रशियाची डिफेन्स सिस्टिम खरेदी केली नसती तर आज चंदीगढ, जम्मू, जैसलमेर, पठाणकोटचे चित्र वेगळे असले असते. परंतू, रशियाच्या मैत्रीने पुन्हा एकदा भारताला वाचविले आहे. भारताने शेकडो ड्रोन, मिसाईल हवेतच नष्ट केली आहेत. यामुळे कितीही दबाव आला तरी रशिया हा भारताचा मित्र राहणार आहे.


## कराची अन् इस्लामाबादचं कनेक्शन तुटलं

### भारताच्या INS विक्रांतचा पाकिस्तानवर मोठा हल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९कराची –** पाकिस्तानने जम्मू काश्मीर, राजस्थान, पंजाबच्या सीमाभागातील शहरांवर ड्रोन हल्ल्याचा प्रयत्न केला. त्याला भारतीय सैन्याने सडेतोड उत्तर देत ड्रोन, मिसाईल हल्ले हाणून पाडले. त्यातच भारतीय नौदलानेही पाकिस्तानविरोधात मोर्चा उघडला आहे. भारतीय युद्धनौका खच्छड विक्रांतने कराची बंदरावर जोरदार हल्ला केला आहे. या हल्ल्याची कराची बंदरात मोठे नुकसान झाल्याची माहिती आहे.

१९७१ च्या युद्धानंतर भारतीय नौदलाकडून पहिल्यांदाच कराचीसारख्या प्रमुख शहरावर हल्ला करण्यात आला आहे. कराची पाकिस्तानची



आर्थिक राजधानी मानली जाते. सैन्य सूत्रांनुसार, खच्छड विक्रांत आणि अन्य युद्धनौकांनी रात्रीच्या अंधारात पाकिस्तानच्या नौदल तळ, इंधन डेपो आणि इतर प्रमुख सैन्य छावण्यांना टार्गेट केले. या हल्ल्यात अचूक टिपणाऱ्या मिसाईलसोबत समुद्रात लांबून डागणाऱ्या शस्त्रांचा वापर करण्यात आला.

## विभाग राज्य माहिती आयुक्त यांचे सपत्नीक कुलस्वामिनी श्री अंबादेवी दर्शन।...



श्री रवींद्र ठाकरे यांनी आज अमरावती विभाग राज्य माहिती आयुक्त पदाचा प्रभार स्वीकारल्यानंतर विदर्भाची कुलस्वामिनी श्री अंबादेवीचे सपत्नीक दर्शन घेतले . यावेळी त्यांचा अंबादेवी संस्थानच्यावतीने सत्कार करण्यात येऊन त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या .प्रकाश काळबांडे यांच्या संचालकपदावरील धोका टळला–

## ५४ वर्षांनंतर पाकिस्तानचा राजस्थानवर हल्ला, पण अयशस्वी

### जैसलमेर–पोकरणमध्ये पाकिस्तानी ड्रोन पाडले; सीमावर्ती गावे रिकामी, ४ विमानतळ बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९जैसलमेर**

पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने केलेल्या हवाई हल्ल्यानंतर पाकिस्तानने राजस्थानमधील ५ लष्करी तळांवर हल्ला केला. १९७१ मध्ये पाकिस्तानने राजस्थानवर शेवटचा बॉम्बहल्ला केला होता.

बुधवार आणि गुरुवारी रात्री झालेल्या ड्रोन हल्ल्याचा प्रयत्न भारतीय सैन्याने हाणून पाडला. सर्व ड्रोन हवेत पाडण्यात आले. सतर्कतेमुळे, गुरुवारी रात्री संपूर्ण ६ जिल्ह्यांमध्ये वीजपुरवठा खंडित झाला. सीमावर्ती जिल्ह्यांमधील विमानतळ देखील बंद करण्यात आले आहेत. तणाव वाढल्यानंतर, राजस्थान सरकारने सीमावर्ती जिल्ह्यांमधील अनेक विभागांमधील रिक्त पदांसाठी रात्रीतून नियुक्त्या केल्या आहेत. अनेक गावेही रिकामी करण्यात आली आहेत. गुरुवारी रात्री उशिरा मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनीही उच्चस्तरीय बैठक घेतली.

७–८ मे च्या मध्यंतरी रात्री, उत्तरलाई, नल आणि फलोदी हवाई तळांवर क्षेपणास्त्रे डागण्यात आली, जी भारताच्या हवाई संरक्षण प्रणाली ड–४०० ने हवेतच नष्ट केली.



गुरुवारी (८ मे) रात्री ९ वाजता जैसलमेर–पोखरणमधील लष्करी तळांवर ड्रोनने हल्ला करण्यात आला. त्यांनाही हवेत गोळ्या घालून ठार मारण्यात आले. हा एका झुंडीचा हल्ला होता, म्हणजेच ड्रोनच्या झुंडीने हल्ला करण्यात आला.परिस्थिती लक्षात घेता, जोधपूर, जैसलमेर, बारमेर, बिकानेर, श्रीगंगानगर, पाली येथे वीजपुरवठा खंडित करण्यात आला. जैसलमेरमध्ये रात्री ९ ते सकाळी ६ वाजेपर्यंत वीजपुरवठा खंडित राहील. श्रीगंगानगरमधील महाविद्यालये आणि कोचिंग सेंटर बंद करण्यात आले आहेत.

सीमेलगतच्या भागातील सध्याची परिस्थिती लक्षात घेता, सरकारने राजस्थान प्रशासकीय सेवेच्या (ठ–ड) ९ अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे .यासोबतच, सीमेजवळील जिल्ह्यांमधील अग्निशमन दलाच्या सर्व रिक्त पदे भरण्यात आली आहेत. राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांच्या रजा रद्द करण्यात आल्या आहेत.

## नागपूरच्या विधान भवनाच्या जागेसाठीचा वाद मिटला

### ताबडतोब जागांचे हस्तांतरण करावे, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी दिले निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९नागपूर**

नागपूरच्या विधानभवनाच्या विस्तारासाठी लागणाऱ्या जागेचा प्रश्न राज्याचे महसूलमंत्री व नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोडवला असल्याचे समजते. त्यामुळे जागेसाठी सुरू असलेला वाद संपुष्टात येणार आहे. सरकारी मुद्रणालयाचा तसेच शहर पुरवठा कार्यालयाच्या काही जागा नागपूर विधानभवनाच्या विस्तारीकरणासाठी आवश्यक आहे. त्यामुळे ताबडतोब जागांचे हस्तांतरण करावे, असे आदेशच बावनकुळे यांनी दिले आहेत.सरकारी मुद्रणालय तसेच शहर पुरवठा कार्यालयाच्या काही जागा देण्यात घासघीस सुरू होती. तसेच दोन्ही कार्यालयांनी पर्यायी जागा शोधून प्रस्ताव सादर करावा, असे आदेश बावनकुळे यांनी दिले आहेत. त्यामुळे जागेवरून सुरू असलेला वाद आता मिटला आहे. नागपूर विधानभवनाच्या विस्तारीकरणासाठी आता जागा उपलब्ध होणार आहेत.



महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, सरकारी मुद्रणालय आणि पुरवठा विभागाला नवीन जागा उपलब्ध करून देण्यात येईल. त्यांनी पुढील दोन दिवसात जागांचा शोध घेऊन त्याबाबत प्रस्ताव सादर करावेत. शासकीय जागा असल्या तरी या गोदामातून शहरातील लोकांना कमीत कमी वेळेत धान्य पुरवठा होईल अशा पद्धतीची जागा उपलब्ध करून देण्यात येईल. नवीन जागा पाहून त्या ठिकाणी बांधकाम करून दिल्यानंतरच संबंधित जागा ताब्यात घेण्यात येईल.याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक घेऊन त्यावर शिक्कामोर्तब करण्यात येईल. शासकीय मुद्रणालयाची काही जागा शिल्लक आहे. ही जागा विधानभवनासाठी आवश्यक आहे. तसेच शहर पुरवठा विभागाचे उर्वरित जागेमध्ये देखील बांधकाम करणे आवश्यक असल्याने या दोन्ही जागा शासनास देण्यात याव्यात, असे निर्देश बावनकुळे यांनी दिले आहेत. तसेच याच परिसरात असलेला झिरो माईलही विकसित करण्यात येणार आहे. तसेच आवश्यक असणारे सर्व विभाग या इमारतींमध्ये तयार करण्यात येतील, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली आहे.

## पाकिस्तान युद्धात गंगा एक्सप्रेसवे ठरला गेम चेंजर :राफेलपासून हरक्यूलिस उतरले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९लखनऊ/शाहजहानपूर–** ऑपरेशन सिंदूरद्वारे पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला घेतल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव आणखी वाढला आहे. दोन्ही देशांची तयारी तीव्र झाली आहे. या परिस्थितीत, शाहजहांपूरच्या गंगा एक्सप्रेसवेचे महत्त्व अलिकडे आणखी वाढले आहे. भारतीय हवाई दलाने २ मे रोजी येथे पहिले रात्रीचे लँडिंग करून एक विक्रम प्रस्थापित केला होता. हा केवळ रात्रीच्या लँडिंगसाठीचा सराव नव्हता तर युद्धादरम्यान एक मोठा गेम चेंजर ठरेल.लष्करी तयारी, आपत्कालीन कारवाया आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने ही चाचणी खूप महत्त्वाची होती. राफेलपासून ते सी–१३०जे सुपर



हरक्यूलिसपर्यंत, सर्वांनी या सरावात भाग घेतला. संरक्षण तज्ज्ञांच्या मते, पाकिस्तानशी युद्ध झाल्यास गंगा एक्सप्रेसवे हवाई दलासाठी खूप उपयुक्त ठरेल. येथून पाकिस्तान सीमेपर्यंतचे अंतर फक्त ८०० किलोमीटर आहे.गंगा एक्सप्रेसवे युद्धकालीन धावपट्टी म्हणून तयार करण्यात आला आहे. रात्रीच्या लँडिंगने हे सिद्ध केले की भारतीय हवाई दल अंधारातही अचूक ऑपरेशन करण्यास सक्षम आहे. जर एखाद्या एअरबेसवर हल्ला झाला तर गंगा एक्सप्रेसवेसारखे पर्यायी धावपट्ट लवकर कार्यान्वित करता येतील.

## महाराष्ट्रात अलर्टः देवेंद्र फडणवीस यांनी बोलावली तातडीची सुरक्षा बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९मुंबई–** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीची सुरक्षा बैठक बोलावली आहे. आज दुपारी होणाऱ्या या बैठकीचे उद्दिष्ट परिस्थितीचा आढावा घेणे आणि सध्याच्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सुरक्षा उपाययोजनांचा आढावा घेणे आहे. भारताच्या सीमेवर कमालीचा तणाव वाढला आहे. यात भारतातील अतिशय संवेदनशील शहर असलेले मुंबई आणि उपनगराची सुरक्षा महत्त्वाची आहे. त्या दृष्टिकोनातून या बैठकीकडे पाहिले जात आहे. भारत आणि पाकिस्तानमधील सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपत्कालीन सुरक्षा बैठक बोलावली आहे. आज दुपारी होणाऱ्या या बैठकीचा उद्देश सध्याच्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर परिस्थितीचा आढावा घेणे आणि राज्यभरातील सुरक्षा उपाययोजनांचा आढावा घेणे आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या



व्यतिरिक्त, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी सांगितले होते की, सुरक्षेबाबत बैठक घेतली जाईल. पोलिस सज्ज आहेत आणि लोकांना सतर्क करण्यासाठी मॉक ड्रिल आयोजित केले जात आहेत.

### पर्यटन स्थळांची, आध्यात्मिक स्थळांची सुरक्षा वाढवली

महाराष्ट्रातील महत्त्वाच्या प्रतिष्ठानांची, पर्यटन स्थळांची, आध्यात्मिक स्थळांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. त्या सर्व ठिकाणी अधिक दक्षता ठेवण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आल्या आहेत.मुंबई पोलिसांनी सर्व कर्मचाऱ्यांसाठी नवीन रजा मंजूर करणे स्थगित केले आहे. वैयक्तिक आपत्कालीन परिस्थिती शिवाय कोणत्याही पदासाठी रजा मंजूर करू नये असे निर्देश वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

## केळीचे गाव म्हणून काकनवाडा बुद्रूकची ओळख

### विकासाची वाट धरणाऱ्या गावात ४०० हेक्टरवर लागवड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९बुलढाणा–** आधुनिक केळी उत्पादन करणारे गाव म्हणुन काकनवाडा या गावाची ओळख असून ४०० हेक्टर पैकी ९० टक्के बागायती क्षेत्र या गावाला आहे. त्यातील २५० हेक्टर क्षेत्रावर केळी हेच फळ पीक घेतल्या जात आहे. सिंचन लाभल्यामुळे या गावाने विकासाची वाट धरली आहे. वारी हनुमान उगमस्थान आणि श्री त्र्यंबकेश्वर महाराज तीर्थक्षेत्र वान नदीच्या कुशीत काकनवाडा वसले आहे. अडीच हजार लोकसंख्या असलेले नव्वद टक्के बागायती कृषि क्षेत्र लाभलेले गांव आहे. वान नदीचा गावाला वेढा असून ठिकठिकाणी बंधाऱ्यांनी पाणी अडवले जाते. सिंचनाची वर्षभर पुरेशी



सुविधा उपलब्ध असल्यामुळे २५० शेतकऱ्यांनी जवळपास २५० हेक्टर क्षेत्रावर आधुनिक केळी लागवड केली आहे. एका एकरला एक ते सव्वा लाख खर्च लागत असून शेतकऱ्यांना अडीच ते तीन लाख उत्पन्न मिळत आहे. आधुनिक केळी लागवडीने मुले शेतकरी यांना आर्थिक उन्नती सोबतच मजुर वर्गाला वर्षभर हाताला काम मिळत आहे. त्यामुळे त्यांनाही आर्थिक हातभार लाभला आहे. दर्जेदार केळी असल्यामुळे राज्यासह इतर राज्यात दिल्ली, कर्नाटक, उडीसा, मध्य प्रदेश आदी राज्यामध्ये केळीची निर्यात केली जाते.३० ते ४० टन केळीची परराज्यात निर्यात वारकरी केळी सप्लायर्सच्या माध्यमातून काकनवाडा बु. मधून जवळ पास ३० ते ४० टन प्रतिदिन बाहेरील राज्यामध्ये निर्यात केली जाते. शेतकऱ्यांच्या केळी मालाची खराब होण्यापासून चेंबर उभारण्यात आले आहे. शेतकऱ्यांना केळी पिका पासून जास्तीत उत्पन्न मिळण्यासाठी दळण वळणांच्या सुविधांपासून ते बाहेर राज्यात निर्यात करण्याचे काम केले जाते. असे येथील शेतकरी नीळकंठ ढाव सांगतात.केळी पिकावर आधारित उद्योग असायला शासन योजना करणे आवश्यकता आहे.

# सभासदत्व कायम : हायकोर्टाचा विभागीय सहनिबंधकांच्या निर्णयावर 'स्टे'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक प्रकाश काळबांडे यांचे सहकार महर्षी बापूसाहेब काळबांडे शालेय कर्मचारी सहकारी पतसंस्था अमरावतीचे सभासदत्व रद्द करण्याच्या विभागीय सहनिबंधकांच्या निर्णयाला नागपूर उच्च न्यायालयाने स्टे दिला आहे. त्यामुळे प्रकाश काळबांडे यांचे मुळ संस्थेवरील सभासदत्व कायम असल्याने त्यांच्या संचालपदावर आलेला धोका टळला आहे. हायकोर्टाने दिलेल्या स्टे ऑर्डरची प्रत काळबांडे यांनी जिल्हा बँकेकडे पाठविली असून त्यांचे संचालकपद देखील त्यामुळे कायम राहणार आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विद्यमान अध्यक्ष आणि उपाध्यक्षांनी मनमर्जी तसेच गैरकारभाराविरोधात सभागृहात सातत्याने परखडपणे बोलणारे प्रकाश काळबांडे यांच्या विरोधाला दाबण्यासाठी सत्ताधारीगटातील काही संचालकांनी त्रयस्थ व्यक्तींच्या मार्फत प्रकाश काळबांडे यांच्याविरोधात त्यांचे सभादत्व तसेच जिल्हा बँकेचे संचालकपद रद्द करण्यासाठी तक्रारी दाखल केल्या होत्या. त्यावर सहकारी कोर्टात दबाव आणून प्रकाश काळबांडे यांचे सहकार महर्षी बापूसाहेब काळबांडे शालेय कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे सभासदत्व रद्द करण्याचा निर्णय उपजिल्हा सहकारी निबंधक तसेच त्यानंतर विभागीय सहनिबंधक यांनी दिला होता. सदर निर्णयाविरोधात प्रकाश काळबांडे यांनी नागपूर हायकोर्टात याचिका दाखल केली होती. यावेळी हायकोर्टासमोर तक्रारकर्त्या व्यक्तीचा सदर संस्थेशी कुठलाही संबंध नसल्याचे उघड झाले असून संबंध नसताना प्रकाश काळबांडे यांच्या संस्थेच्या अंतर्गत विषयात तक्रारी करून त्यांच्याविरोधात तक्रारी करण्याच्या विषयाला हायकोर्टाने फटकारले आहे. यामध्ये काळबांडे यांच्या वकिलांनीविठ्ठलनगर सहकारी गृहनिर्माण संस्था, मुंबई विरुद्ध विभागीय संयुक्त निबंधक, सीएसएमडी आणि इतर २०१५ (२) एमएच.एल.जे. ४५२ या केसचा उल्लेख करत बाहेरील व्यक्तींना तक्रारी करण्याचा कुठलाही अधिकार नसल्याचे स्पष्टपणे सांगितले आहे. त्यावर हायकोर्टाने प्रकाश काळबांडे यांचे सभासदत्व रद्द करण्याच्या उपजिल्हा सहकारी निबंधक तसेच विभागीय सहनिबंधकांनी दिलेल्या सर्व प्रकारच्या आदेशांना एकाच वेळी रद्द करून प्रकाश काळबांडे यांचे सभासदत्व कायम ठेवण्यास १५ एप्रिल २०२५ रोजीच्या आदेशाद्वारे सांगितले आहे. त्यामुळे प्रकाश काळबांडे यांचे मुळ संस्थेवरील सभासदत्व हायकोर्टाने कायम ठेवल्याने त्यांचे जिल्हा बँकेवरील संचालकपद देखील कायम असणार आहे. या प्रकरणी कोर्टासमक्ष प्रकाश - काळबांडे यांच्या वतीने ॲड. निलेश काळवाघे तसेच ॲड धनंजय राऊत यांनी बाजू मांडली.

## आदेशाची प्रत बँकेला पाठवली : प्रकाश काळबांडे



हायकोर्टाने माझे मुळ संस्थेवरील सभासदत्व रद्द करण्याच्या सर्व प्रकारच्या निर्णयांना स्थगिती दिली असून त्यामुळे माझे सभासदत्व कायम आहे. सदर आदेशाची प्रत मी अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष तसेच सीईओंना पाठविली आहे. बँकेतील भ्रष्टाचाराविरोधात मी परखडपणे बोलत असल्याने माझ्याविरोधात विरोधकांनी रचलेले हे कारस्थान होते. त्याला हायकोर्टाच्या आदेशामुळे चपराक बसली आहे असे प्रकाश काळबांडे यांनी म्हटले आहे.

# वाढत्या उन्हामुळे दुग्ध उत्पादकांची चिंता वाढली

## उत्पादनात घट, हिरवा चारा व गोठे थंड ठेवण्याची गरज



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

दिवसेंदिवस तापमानाचा पारावाढू लागल्याने पाळीव जनावरांची लाहीलाही होत आहे. जनावरांना हिरवा चारा व थंड वातावरण नसल्यामुळे दुधाच्या उत्पादनात घट होत आहे. त्यामुळे दुग्ध उत्पादकांमध्ये चिंता वाढली आहे. अनेक पशू पालक आपल्या जनावारांसाठी सावली प्रयत्नात दिसून येत आहेत. करण्याचागावरान, संकरित गाई व विदेशी रक्तगट असणाऱ्या गाई साठी २४ ते २६ अंश सेल्सिअस तापमान व देशी गाई साठी ३३ अंश सेल्सिअस, तर म्हशीसाठी ३६ अंश सेल्सिअस तापमान सहन करू शकतात. परंतु, जिल्ह्याचे तापमान ४४ अंशावर जात आहे. यामुळे जनावरे उष्णतेच्या (हिट ट्रेस) बळी पडतात. याचा जनावरांच्या आरोग्यावर उत्पादनावर व प्रज्योत्पादनावर विपरीत परिणाम होतो.संकरित व विदेशी रक्तगटाच्या गाई व देशी गाईपेक्षा उष्णतेच्या हिट ट्रेसला जास्त बळी पडतात.

### तापमानामुळे जनावरांवर होणारे दुष्परिणाम

हवेतील उष्णता वाढल्यामुळे जनावरांच्या तापमानात देखील कमालीची वाढ होते. त्यामुळे ही ऊर्जा उत्पन्नास हवी असते ते शरीराचे तापमान संतुलित राखण्यास खर्च होते. परिणामी दूध उत्पादन ५० टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकते. शरीराचे तापमान वाढते, त्यामुळे जनावरांची भूक कमी होऊन पाण्याची गरज अधिक वाढते. ती पूर्णपणे भागवली नाही, तर शरीरातील पेशीमध्ये पाणी कमी होते. शरीरात तापमान वाढते, त्यामुळे भूक मंदावते. जनावरांची रोगप्रतिकार शक्ती कमी होऊन जनावरे इतर आजारांना बळी पडतात.

# अट्टल चोरटा गजाआड, दोन चोरीचे गुन्हे उघड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने घरफोडी करणाऱ्या एका अट्टल चोरट्याला ७ मे रोजी मटक केली. त्याने शिरजगाव कसबा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दोन चोरीच्या गुन्ह्यांची कबुली दिली आहे. रोहित अनिल खैरकार २४, रा. कारंजा बहिरम ता. चांदूर बाजार) असे चोरट्याचे गाव आहे. कारंजा बहिरम येथील शेख अश्फाक शेख रऊफ ३६) यांच्या घरातून १६ हजारांचा ऐवज लंपास करण्यात नाला होता. त्यात शिरजगाव कसबा पोलिसांनी ३१ मार्च रोजी न्हा दाखल केला. तर, दुसऱ्या घटनेत ३ मे रोजी कारंजा हिरम येथील भीमराव जयराम मोहोड (७७) यांनी चोरीची क्रार दिली होती. ते घराचा दरवाजा लावून बाहेर गेले असता चोराने त्यांच्या घरातून १० हजार रुपये नगदी व ६०० रुपयांच्या नाड्या चोरून नेल्या होत्या. त्या दोन्ही घटनांचा तपास करत असताना स्थानिक गुन्हे शाखेने ७ मे रोजी रोहित खैरकारला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने कारंजा बहिरम येथील ते दोन्ही गुन्हे केल्याचे कबुली दिली. त्याच्याकडून दोन्ही गुन्ह्यात चोरी गेलेली टिव्ही, सिलिंडर व नगदी ३२०० रुपये असा एकुण १,८०० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. आरोपीस शिरजगाव कसबा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात मथकाने ही कारवाई केली आहे.

# एक भाजी कमी असली तरी ठीक; पण लग्नात ताक हवंच



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

मागील काही दिवसांपासून तापमान सातत्याने वाढत आहे. ४५ अंशांवर तापमान पोहोचले असून, नागरिक बेजार झाले आहेत. तापमानामुळे विवाहाच्या पंगतीत मठ्ठा कम्पल्सरी बनला आहे. मठ्ठा नसेल तर पाहुणे नाराज होण्याची भीतीही कुटुंबीयांना आहे. त्यामुळे प्रत्येक विवाह समारंभात सध्या मठ्ठा दिसून येत आहे.ऊन वाढले असून, लग्न समारंभात वऱ्हाडी हैराण होत आहेत. त्यामुळे दुपारच्या वेळी मठ्ठा त्यांना थंडावा देत आहे. मागील काही दिवसांमध्ये दही, दूध, ताकाचे दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. त्यामुळे सामान्यांच्या खिशाला आर्थिक भार सहन करावा लागत आहे.मठ्ठा तयार करणे अगदी सोपे आहे. दही घेऊन ते घुसळावे. त्यानंतर त्यामध्ये थंड पाणी मिसळून चवीनुसार मीठ, जिरेपूड, कोथिंबीर टाकावी.

**दोनपैकी एकच भाजी चालेल; पण ताक हवंय!**

वऱ्हाडी उन्हाने घामाघूम होत आहेत. त्यामुळे दुपारच्या वेळी ताक पिण्याकडे प्रत्येकजण वळत आहे. जेवणामध्ये दोन भाज्या नसल्या तरी चालतील. पण, मठ्ठा ठेवा, असे आवर्जून सांगितले जात आहे.

# पशुसंवर्धन विभागाच्च्या योजनांसाठी ऑनलाइन अर्ज २ जूनपर्यंत मुदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

पशुसंवर्धन विभागामार्फत जिल्हास्तरावर अनुदानावर विविध योजना राबवण्यात येतात. या योजनाचा लाभ घेण्यासाठी दि. २ जून पर्यंत ऑनलाईन अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. अमितकुमार दुबे व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. तृप्ती पाटील (खेडेकर) यांनी केले आहे. राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनेंतर्गत दुधाळ गाई- म्हशींचे वाटप करणे, शेळी मेंढी गट वाटप करणे, १००० मांसल कुक्कुट पक्ष्यांच्या संगोपनासाठी निवारा शेड उभारणीस अर्थसाहाय्य देणे, १०० कुक्कुट पिलांचे वाटप या योजनांसाठी ऑनलाईन पद्धतीने लाभार्थी निवड प्रक्रिया चालू वर्षात राबवली जाणार आहे. पशुसंवर्धन विभागामार्फत स्मे पासून प्रक्रिया सुरू करण्यात आली असून २ जूनपर्यंत डेडलाइन देण्यात आली आहे. दि. २५ ते २७ जून या कालावधीत लाभार्थ्यांमार्फत कागदपत्रातील त्रुटींची पूर्तता केली जाईल. २ जुलै रोजी लाभार्थीची अंतिम यादी तयार केली जाणार आहे. या योजनेचा लाभघेण्यासाठी पशुपालकांनी अर्जासोबत स्वतःचा मोबाइल नंबर द्यावा. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

# चांदूर बाजार तालुक्यात १०० बोगस दाखले असल्याचा किरीट सोमय्यांचा दावा

## एका आठवड्यात गुन्हा दाखल होणार : अवैध बांगलादेशींचा मुद्दा भाजप नेते किरीट सोमय्या चांदूर बाजार पोलीस ठाण्यात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ चांदूर बाजार**

चांदूर बाजार तालुक्यात बांगलादेशी नागरिक अवैधपणे राहत असून अशा नागरिकांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी भाजप नेते किरीट सोमय्या यांनी चांदूर बाजार पोलीस ठाण्यात ठाण मांडले होते सोमय्या यांनी येतांना काही पुरावे सोबत आणले चांदूर बाजार तालुक्यातील बांगलादेशी नागरिकांना बोगस जन्म दाखले देणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांसह दोषी नागरिकांच्या विरूध्द गुन्हे दाखल करण्याचा अर्ज त्यांनी चांदूर बाजार पोलीस ठाण्यात दिला तालुक्यात १०० बोगस जन्म प्रमाणपत्र असल्याचा दावा सोमय्या यांनी केला आहे अमरावती जिल्हात बांगलादेशी असल्याचा आरोप सोमय्या यांनी काही दिवसांपूर्वी केला होता दिनांक ९ मे रोजी चांदूर बाजार पोलीस स्टेशनला दाखल झाल्यानंतर त्यांनी उपविभागीय पोलिस अधिकारी शुभम कुमार व पोलीस निरीक्षक संतोष ताले यांच्याशी चर्चा केली आयपीएस शुभम कुमार यांनी सोमय्या यांची बाजू ऐकून घेतली यावेळी तहसीलदार शेळके व नायब तहसीलदार लक्ष्मीकांत तिवारी उपस्थित होते किरीट सोमय्या चांदूर बाजार शहरात दाखल झाल्यानंतर त्यांच्या स्वागतासाठी भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने पोलीस स्टेशनला उपस्थित होते यावेळी भाजपा चांदूर बाजार ग्रामीण तालुकाध्यक्ष रमेश तायवाडे , शहराध्यक्ष टिकू अहिर, हर्षद धुळे, जयश्री पन्नागडे, अतुल रघुवंशी, मनोहर सुने, नरेश बर्वे, बाळासाहेब कोरडे,रावसाहेब गुलक्षे, नंदू अर्दक, योगेश भेटाळू,शुभम तरारे, भूषण अहिर, आकाश उठाळे,ओंकार बोरवार सह आदी कार्यकर्त्यांनी फटाक्यांची अतिशबाजी व पुष्पगुछ देऊन सोमय्या यांचे स्वागत केले पत्रकारांशी बोलतांना त्यांनी सांगितले की मी १०० बोगस प्रमाणपत्र घेऊन आलो आहे आणी यामध्ये ५० टक्केपेक्षा अधिक बोगस प्रमाणपत्र असल्याची तक्रार मी पोलिसांना दिली आहे ज्यामध्ये बोगस दस्ताऐवज आहे आणी एका आठवड्यात पोलीस या संदर्भात गुन्हा दाखल करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे सोमय्या १०० बोगस जन्म प्रमाणपत्र घेऊन चांदूर बाजार शहरात दाखल झाल्याने तालुक्यात अवैधपणे वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला किरीट सोमय्या नागपूर विमानतळावरून थेट चांदूर बाजार मध्ये दाखल झाले होते यावेळी पोलिसांनी मोठा पोलीस फाट तैनात केला होता.

### एका आठवड्यात पोलीस या संदर्भात गुन्हा दाखल करणार

पत्रकारांशी बोलतांना त्यांनी सांगितले की, मी १०० बोगस प्रमाणपत्र घेऊन आलो आहे आणी यामध्ये ५० टक्केपेक्षा अधिक बोगस प्रमाणपत्र असल्याची तक्रार मी पोलिसांना दिली आहे ज्यामध्ये बोगस दस्तऐवज आहे आणी एका आठवड्यात पोलीस या संदर्भात गुन्हा दाखल करणार असलायचे त्यांनी म्हटले आहे सोमय्या हे १०० जन्म प्रमाणपत्र घेऊन चांदूर बाजार शहरात दाखल झाल्याने तालुक्यात अवैधपणे वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला

### जिल्ह्यावर जिल्हाधिकऱ्यांचे नियंत्रण नाही?

भाजपा नेते किरीट सोमय्या थेट मुंबई वरून येऊन अमरावती जिल्हात बोगस प्रमाणपत्र असल्याचा दावा करतात आणी अनेक बोगस प्रमाणपत्र सुद्धा आढळतात त्यामुळे अमरावती जिल्हाधिकारी यांचे जिल्हात नियंत्रण नसल्याची चर्चा आता नागरिक करित आहे.

# भाजपा शिक्षक आघाडीचे चंद्रशेखर भोयर यांचे महसूल मंत्री बावनकुळे यांना पत्र

## ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेवर परिणाम करणारा १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय रद्द करणेबाबत ची केली मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

राज्याचे महसूल मंत्री व अमरावती जिल्याचे लोकप्रिय पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शिक्षण मंत्री यांना तात्काळ बैठक घेऊन रद्द करण्याबाबत केली चंद्रशेखर भोयर यांनी मागणी केली आहे.

राज्यातील ग्रामीण भागातील भौगोलिक परिस्थिती व ग्रामीण भागातील कुटुंबांचे रोजगार निमित्तीसाठी होणारे स्थलांतर या कारणांमुळे वाडी, वस्ती, डोंगराळ, दुर्गम भागात व छोट्या-छोट्या गावात उच्च प्राथमिक च्या वर्गात अनेक ठिकाणी २० किंवा २० पेक्षा कमी पटसंख्या आहे. अशा शाळेत नवीन संचमान्यता दिनांक १५मार्च, २०२४ च्या शासन निर्णयानुसार पूर्वीप्रमाणे पुरेसे शिक्षक पद मंजूर न झाल्याने संपूर्ण महाराष्ट्रात २५ हजारापेक्षा अधिक प्राथमिक शिक्षक अतिरिक्त ठरत आहे.कमी पटसंख्येच्या उच्च प्राथमिक शाळातील वर्गासाठी शिक्षकाचे पद पुरेसे न दिल्याने प्राथमिक शाळेतील शिक्षकांना आधीच्या दोन ते तीन वर्गासमवेत उच्च प्राथमिकचेही अध्यापन करावे लागणार आहे. त्यामुळे शाळेतोल उच्च प्राथमिक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जावर अंत्यंत प्रतिकूल परिणाम होणार आहे. उच्च प्राथमिक वर्गांना पुरेसे शिक्षक उपलब्ध करून न दिल्याने तेथील विद्यार्थ्यांना बाहेरगावच्या शाळेत स्थलांतरित व्हावे लागणार आहे. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान व सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न भविष्यात निर्माण होणार आहे. शिवाय अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद होणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शिक्षणक व्यवस्था उध्वस्त करणारा आहे.तरी शिक्षण व्यवस्थेवर परिणाम करणारा १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय रद्द करण्याबाबत शिक्षण मंत्री दादा भुसे यांना आपण कळवावे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



# कमाल तापमान २४ तासांत १.४ अंश घटले; किमान तापमान २०.८ अंशावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

अरबी समुद्रापासून ते मध्य प्रदेशपर्यंत कमी दाबाची द्रोणीय स्थिती आहे. तसेच तेलंगणाच्या वर चक्राकार वारे वाहत असून राजस्थान ते झारखंड येथे कमी दाबाची द्रोणीय स्थिती आहे. त्यामुळे जिल्ह्यात अचानक ४० किमी वेगाने वारे वाहत असून, विखुरलेल्या स्वरुपात पाऊसही हजेरी लावत आहे. परिणामी शहरातील कमाल तापमानात २४ तासात १.४ अंश सेल्सियसने घट होऊन ते ३६.८ अंशांपर्यंत घसरले आहे. तसेच किमान तापमान २०८ अंशांपर्यंत खाली आले आहे. हवामानाची अशी स्थिती आणखी दोन दिवस कायम राहणार असल्याचे हवामान खात्याने सांगितले आहे.

# गल्लीबोळातला प्ले स्कूलचा खेळ आता बंद होणार; नोंदणी करणे बंधनकारक

## संस्थेच्या मान्यतेसह शिक्षकांची अर्हता तपासणार : शासनाच्या रजिस्ट्रेशन पोर्टलवर नोंदणीस प्रारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

अंगणवाडीतील तीन ते सहा वयोगटातील मुलांची नोंद शासनाकडे असते; परंतु खासगी शाळांतील नर्सरी, प्री-प्रायमरी शाळांवर नियंत्रण नसते. आता या शाळा व तेथील विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यासाठी शासनाकडून प्री स्कूल रजिस्ट्रेशन पोर्टल सुरू करण्यात येत आहे.



राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०ची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्यात येणार असून, यासाठी प्री स्कूल रजिस्ट्रेशन पोर्टल सुरू करण्यात आले आहे. महिला व बालविकास विभागाकडून चालविल्या जाणाऱ्या अंगणवाडी, बालवाडी याबाबतची माहिती शासनाकडे उपलब्ध आहे; मात्र पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खासगी शाळा, संस्था यावर नियंत्रण नाही. अशा शाळांची आणि शिक्षणव्यवस्थेची माहिती उपलब्ध असावी. ही बाब सर्वांसाठी बंधनकारक करण्यात आलेली आहे.

### या बाबींची माहिती हवी

प्राथमिक शिक्षण संचालनालयाने नोंदणीचे आदेश काढले आहेत. ही नोंदणी करताना संबंधित शाळांना त्यांचे पूर्व प्राथमिक शिक्षण देणारी संस्था, वर्ग तुकड्यांची माहिती, व्यवस्थापनाची माहिती, विद्यार्थिसंख्या, भौतिक सुविधा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नोंदी पोर्टलवर बंधनकारक आहे.

### फी वसुलीसाठी नियमावली

खासगी संस्थांच्या प्ले स्कूलचा अभ्यासक्रम तसेच शुल्क वसुलीसाठी नवीन नियमावली तयार करण्यात आली आहे. पाल्याची फी प्रलंबित असेल तर त्याला मुदत देणे बंधनकारक आहे. फी भरली नाही म्हणून विद्यार्थ्याला वर्गात बसण्यापासून वंचित ठेवता येणार नाही.

### वाटेल तसा पैसा उकळणे आता संस्थेला अवघड

आजवर इंग्रजी माध्यमाच्या प्ले स्कूलमध्ये बहुतांश संस्थांचा मनमानी कारभार चालत होता. मनमर्जीने शुल्क घेणे, लहान सहान गोष्टींसाठी पालकांना त्रास देणे असे प्रकार अनेक शाळांमध्ये चालायचे. अव्वाच्या सव्वा प्रवेश व शिक्षण शुल्क आकारले जात होते. आता पोर्टलवर नोंदणी बंधनकारक करण्यात आल्याने मनमानी फी घेता येणार नाही.

### हे प्रमाणपत्र लागणार

शासनाच्या पोर्टलवर शिक्षकांच्या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व त्याबाबतचे गुणपत्र, प्रमाणपत्र, इमारत पूर्णत्वाचा दाखला, स्वच्छता प्रमाणपत्र पाहिले जाईल. ज्याच्या नोंदी घेण्यात येणार आहे, त्या नोंदी शिक्षणाधिकारी करवून घेणार आहेत.

# आपले सरकार महागले... आता दुप्पट दरवाढ

## प्रमाणपत्रांसाठी मोजावे लागणार अतिरिक्त शुल्क

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

नागरिकांना दैनंदिन जीवनात लागणारे सर्व प्रकारचे दाखले, प्रमाणपत्रांसाठी आता अधिक रक्कम मोजावी लागणार आहे. आपले सरकार या पोर्टलद्वारे दिल्या जाणाऱ्या सर्व सेवांचे शुल्क वाढवण्यात आले असून, ते आता पूर्वपिक्षा दुप्पट झाले आहे. त्यामुळे सेतू केंद्र चालकांनाही दरवाढ केल्याशिवाय आता पर्याय उरला नसून याचा भुर्दड सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागणार आहे. आता आपले सरकार केंद्रामार्फत कागदपत्रे हवी असतील तर प्रत्येक दाखल्यासाठी अतिरिक्त शुल्क मोजावे लागणार आहे.




नागरिकांना दैनंदिन सर्व सेवा मोठी व नागरिक व्यक्त जीवनात अनेक प्रकारचे दाखले व प्रमाणपत्र काढावे लागतात. रहिवासी, उत्पन्न, जन्मदाखला, मृत्यूदाखला, विवाह नोंदणी, दारिद्र्यरेषेखालील, ज्येष्ठ नागरिक, भूमिहीन, शेतकरी, दिव्यांग असे अनेक प्रकारचे दाखले व प्रमाणपत्र आपले सरकार सेवा केंद्रांमार्फत दिले जातात. मात्र आता सरकारने प्रत्येक दाखल्यासाठी अतिरिक्त शुल्क वाढविले आहे. परिणामी नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे.

### सेतू केंद्र चालकांचा नाईलाज

शासनाने प्रत्येक ऑनलाईन प्रमाणपत्र काढण्यासाठी शुल्कवाढ केली आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांना याचा आर्थिक फटका बसत आहे. दरम्यान, सेतू केंद्र चालकांचाही नाईलाज झाला आहे. शासनाने शुल्कामध्ये दरवाढ केल्यामुळे सेतू केंद्र चालकांनाही दरवाढ केल्याशिवाय पर्याय नसल्याचे केंद्र चालकांचे म्हणणे आहे.

# सिटी कोतवाली पोलिसांची मॉक ड्रिल....



भारत-पाकचे युध्द सुरू झाल्यानंतर शहरांवर हल्ला झाल्यास नागरिकांना स्वतःच्या बचावासाठी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. देशभरात मॉक ड्रिल घेण्याचे आदेश केंद्रीय गृह मंत्रालयानं दिले आहेत. मॉक ड्रिलच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या श्रेणीत अमरावती जिल्हयाचा समावेश नसला तरी शहर व ग्रामीण पोलिस हायअर्लटवर आहेत. शहर व ग्रामीण भागात युध्दपातळीवर पाकीस्तान व बांग्लादेशी घुसखोरांची शोधमोहिम सुरू आहे.अश्यातच आज शहरातील जे.डी.मॉल मध्ये सिटी कोतवाली पोलिसांनी दिड तास मॉक ड्रिल केली

# नांदगाव तालुक्यात अवकाळी पाऊस गारपिटीने कांदा फळपिकांचे प्रचंड नुकसान

## शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांचा तहसील व कृषी कार्यालयात ठिय्या



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नांदगांव खंडेश्वर**

सतत आठ दिवसा पासून नांदगाव तालुक्यात अवकाळी पाऊस व गारपिटीने कांदा संत्रा लिंबू इतर फळपिकांचे प्रचंड नुकसान झाले असून तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी या मागणीसाठी ठाकरे गटाच्या शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी शेतकऱ्यांसह तहसील व कृषी कार्यालयात धडक देऊन सडलेले कांदे कृषी अधिकाऱ्यांच्या टेबलावर टाकून आक्रमक भूमिका घेत कार्यालयात ठिय्या दिला तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी यांनी लगेच लेखी आदेश काढून पंचनामे करण्याचे निर्देश दिले यावेळी शेकडो शेतकरी उपस्थित होते



# शेतकरी,शेतमजूरयांच्या जीवाशी खेळु नका आ रवि राणा यांनी सुनावले अधिकाऱ्यांना खडे बोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९भातकुली**

भातकुली तालुक्याची खरीप हंगाम आढावा बैठक आज आमदार रवी राणा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत खरीप हंगाम बाबत उपाय योजना राबविण्याचे संबंधी आढावा घेतांना अधिकारी प्रश्नांची उत्तरं देऊ शकले नाहीं. योजना राबविण्याचे बाबत त्यांचे कडे नियोजन नाहीं. अश्या अनेक बैठकीत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांचे कृषी सहायक , तालुका कृषी अधिकारी उत्तर देऊ शकले नाहीं. शेतकरी हा अन्नदाता आहे, त्यांच्या व शेतकरी यांच्या भरोवश्यावर आपण अन्न खातो. ते आहेतः म्हणून आपण आहों. आधीच अनेक कारणाने दुखी असलेला शेतकरी यांच्या जीवाशी खेळू नका. असे खडे बोल आ.रवी राणा यांनी सुनावले.

## शेतकरी लाभार्थ्यांना टॅक्टर व पेरणी यंत्र आ. रवी राणा यांच्या शुभ हस्ते वाटप



बैठकीत उपस्थित अधिकारी व कर्मचारी कोणीच समाधान कारक उत्तर देऊ शकले नाहीं त्या मुळे आमदार रवी राणा अधिकच चिडले त्यांनी अश्या काम चुकार अधिकाऱ्यांनि आताच सुधरा नाहीतर मी माननीय पालकमंत्री यांचे बैठकीत त्यांचे समोर उभे करून निलंबित करण्याची मी मागणी करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट खडे बोल सुनावले. मग रिस्टेट करण्यासाठी मंत्रालयात चक्रा माराव्या लागणारं अशी तंबी दिली ही वेळ येऊ नका. शेतकऱ्यांचे संपर्कात राहून त्यांचे अडचणी दूर करा. त्यांना शासनाचे योजना मिळवून द्या. गावागावात सभा घेऊन उत्तम बीज.फवारणी औषधे, रासायनिक खते त्याची चाचणी करा.बोगस बियाणे, रासायनिक खते.फवारणी औषधे पकडा भरारी पथक योजना राबविण्याची मोहीम राबवा. कोणताही शेतकरी फसवणूक झाली नाही पाहिजे या विषयावर चर्चा, संवाद सभा घेण्यात आली पाहिजे असे आवाहन आमदार रवी राणा यांनी बैठकीत केले.